cmyk

## संपादकीय

### पवारांचे धोरण ठरल्याप्रमाणे की नवी खेळी!

ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याचे सुतोवाच करताच पवारांची राष्ट्रवादीही एक होऊ शकते याची जोरदार चर्चा रंगली. खुद शरद पवार यांनीच या चर्चेला तोंड फोडले. अजितदादा किंवा सुप्रिया सुळे शरद पवारांच्या पक्षाचा निर्णय घेऊ शकत नाहीत. पण, त्यांनी धूर्तपणे हे नाव पुढे केले आहे. 'सीर सलामत तो पगडी पचास' हे पवारांचे धोरण कधीच लपून राहिलेले नाही. राष्ट्रवादीचे एकत्रीकरण झाले तर फटका एकनाथ शिंदे यांना बसू शकतो तसा भाजपातील निर्णय प्रक्रियेपासून दूर नेत्यांनाही. पवारांच्या या भूमिकेवर विश्वास ठेवून अजितदादांचा प्रस्ताव येतो का हे पाहणेही महत्त्वाचे ठरणारे आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### आयपीएल पुन्हा सुरु होणार

मुंबई:भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर, क्रिकेट चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. एका वृत्तानुसार, आयपीएल २०२५ पुढील आठवड्यापासून पुन्हा सुरू होण्याची अपेक्षा आहे. स्पर्धेतील उर्वरित सामने धर्मशाला वगळता संपूर्ण भारतात खेळवले जातील. तत्पूर्वी आयपीएल २०२५ मधील ५८ वा सामना रद्द झाल्यानंतर ही स्पर्धा एका आठवड्यासाठी पुढे ढकलण्यात आली होती. भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतर परिस्थिती लवकरच सामान्य होईल. अशाप्रकारे ही स्पर्धा बुधवार किंवा गुरुवारी पुन्हा सुरू होण्याची अपेक्षा आहे. मायदेशी परतलेल्या परदेशी खेळाडूंना लवकरात लवकर त्यांच्या संबंधित आयपीएल फ्रँचायझींमध्ये सामील होण्यास सांगण्यात आले आहे. असे म्हटले जात आहे की बीसीसीआयने फ्रँचायझींना मंगळवारपर्यंत अहवाल देण्यास सांगितले आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२२ सोमवार, दि.१२ मे २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सीबीएसईच्या १० वी, बारावीचा आज निकाल

नवी दिल्ली–सीबीएसईची दहावी आणि बारावीची परीक्षा देणारे ४२ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी निकालाची वाट पाहत आहेत. रिपोर्टनुसार, सीबीएसईचा दहावी आणि बारावीचा निकाल दि. मे रोजी जाहीर होऊ शकतो. गतवर्षी बोर्डाने १३ मे रोजी निकाल जाहीर केले होते. यावर्षीही १३ मेपर्यंत निकालांची घोषणा होण्याची शक्यता आहे. पण अद्याप केंद्रीय माध्यमिक शैक्षणिक बोर्डाने याची अधिकृत घोषणा केलेली नाही. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी अधिकृत वेबसाईटवर जाऊन आपल्या निकालाची प्रत मिळवू शकतात.

### भारताने पाकिस्तानात घुसून कारवाई केली– सिंह

नवी दिल्ली–भारताने पाकिस्तानात घुसून कारवाई केली. रावळपिंडीपर्यंत भारतीय सैन्याची धमक पोहोचली आहे, असे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले.

### ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू– हवाई दल

नवी दिल्ली–ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे. ऑपरेशनमधील टास्क यशस्वीपणे पार पाडले. योग्यवेळी सविस्तर माहिती दिली जाईल, असे हवाई दलाने स्पष्ट केले आहे.

### पाकिस्तानला विचारा ब्रह्मोसची ताकद काय– योगी आदित्यनाथ

लखनऊ–ऑपरेशन सिंदूरदरम्यान तुम्ही ब्रह्मोस क्षेपणास्त्राची झलक नक्कीच पाहिली असेल. जर तुम्ही पाहिले नसेल, तर पाकिस्तानच्या लोकांना ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या शक्तीबद्दल विचारा. दहशतवाद कधीही प्रेमाची भाषा स्वीकारू शकत नाही. त्याचे उत्तर त्याच्याच भाषेत द्यावे लागेल. ऑपरेशन सिंदूरद्वारे भारताने संपूर्ण जगाला एक संदेश दिला आहे, असे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले.

### पाकिस्तानने नीचपणा दाखवला– शिंदे

मुंबई–युध्दविरामानंतर सुद्धा पाकिस्तानने सीमेवर गोळीबार केला. त्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तानची हरकत बेमानी आहे. आमची सेना तयार आहे. कुत्र्याची शेपटी वाकडी ती वाकडीच ती सरळ होत नाही त्यामुळे ती कापावी लागेल असे शिंदे म्हणाले.

### पुण्यात लेझर लाईटवर बंदी

पुणे– शहरात लेझर लाईट सोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. शहरात प्रखर प्रकाश झोत असलेले बीम लाईट, लेझर बीम लाईट सोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. पोलिससह आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. पुण्यात असलेल्या लोहगाव हवाई दलाच्या तळामुळे हा निर्णय घेतला आहे.

### टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा ११ जूनला होणार

पुणे–महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा येत्या ११ जून २०२५ पासून ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. राज्यातील एकूण १७५ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

### सीए परीक्षा पुढे ढकलल्या; आयसीएआयचा निर्णय

मुंबई–देशातील सध्याची तणावपूर्ण परिस्थिती पाहता, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने चार्टर्ड अकाउंटंट अभ्यासक्रमाच्या परीक्षा लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ९ ते १४ मे दरम्यान आयोजित होणाऱ्या इंटरमिजिएट, अंतिम आणि पोस्ट क्वॉलिफिकेशन कोर्सच्या परीक्षा आता पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आला असून, सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल, असं संस्थेने स्पष्ट केले आहे.

# स्थानिक नैसर्गिक आपत्तीची भरपाई देण्याची अट वगळली

## नव्या पीकविमा धोरणात बदल, शेतकऱ्यांचा तोटा होत असल्याने नाराजी

**पुणे । प्रतिनिधी**

गेली दोन वर्षे खरीप पीकविमा योजना एक रुपयात उपलब्ध करून दिल्यानंतर स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीसाठी भरपाई दिली जात होती. मात्र, याच घटकातून महसूल विभाग देखील पिकांच्या नुकसान भरपाईसाठी पीकनिहाय मदत करीत होते. त्यामुळे नवीन पीकविमा योजनेत स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पिकांचे नुकसान ही अटच रद्द करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांचा तोटा होत असून यामुळे शेतकऱ्यांत नाराजी पसरली आहे. पान २ वर




### दोनदा नुकसान नभरपाई टाळण्यासाठी


स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पिकांचे नुकसान या घटकाअंतर्गत मदत व पुनर्वसन विभागाकडून कोरडवाहू, बागायती व फळपिकांच्या नुकसानीसाठी मदत केली जात आहे. त्यामुळे एकाच घटकाअंतर्गत राज्य सरकारकडून दोनदा नुकसा नभरपाई दिली जात होती. त्यामुळेच खरीप पीकविमा योजनेतून हा घटक वगळण्यात आल्याचे कृषी विभागातील सूत्रांचे म्हणणे आहे.

### चार घटक वगळले?

नवीन पीकविमा योजनेत जुन्या योजनेतील पाऊस न पडल्याने पेरणी न करता येणे, स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे होणारे नुकसान, नैसर्गिक कारणांमुळे पिकांचे होणारे काढणी पश्चात नुकसान, तसेच पिकांच्या हंगामामध्ये हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे होणारे नुकसान हे चार महत्त्वाचे घटक वगळण्यात आले आहेत.

# १०० दहशतवादी, ४० पाकिस्तानी जवानांचा मृत्यू

## जैश अन् लष्कर ए तोयबाचे तळ केले उद्ध्वस्त; लष्करी अधिकाऱ्यांनी दिली माहिती



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. यानंतर पाकिस्तानकडून भारतावर हल्ल्यांचे झालेले प्रयत्न भारतीय लष्कराने हाणून पाडले. दोन देशातील तणाव अखेर शस्त्रसंधीने कमी झाला. शस्त्रसंधीनंतर भारतीय लष्कराच्या तिन्ही दलांनी एकत्र पत्रकार परिषद घेत ऑपरेशन सिंदूरबाबत मोठे खुलासे केले आहेत.**

हवाई दलाच्या डायरेक्टर जनरल एअर ऑपरेशन्स मार्शल अवधेश कुमार भारती यांनी सांगितले की, भारताच्या हवाई दलाने सावधगिरीने फक्त दहशतवादी तळांना लक्ष्य केले. कोणत्याही नागरिकांना यात नुकसान पोहोचवले नाही. भारतीय हवाई दलाने मुरीदके आणि बहावलपूर इथल्या दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केले. ही दोन्ही ठिकाणे आंतरराष्ट्रीय सीमेपासून खूप आत होती त्यामुळे ही निवडणे महत्त्वाचे होते. जैश ए मोहम्मद आणि लष्कर ए तोयबाच्या या दोन्ही तळांवर हल्ला केला गेला. हवाई दलाने या हल्ल्यासाठी सॅटेलाइट आणि इंटेलिजन्सच्या आधारे तयारी केल्याचे अवधेश कुमार यांनी सांगितले. भारताने केलेल्या हल्ल्यात जवळपास १०० दहशतवादी मारले गेले. यात युसुफ अजहर, अब्दुल मलिक, रउफ आणि मुदस्सिर अहमद यांसारख्या कुख्यात दहशतवाद्यांचा समावेश आहे. हे दहशतवादी पान २ वर

# शस्त्रसंधीनंतरही भारताचा पाकिस्तानवर दबाव कायम

## घेतलेल्या पाच निर्णयांमध्ये अजिबात माघार नाही!

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**जम्मू–काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या भयानक दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर दबाव आणण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली. या सर्व पावलांचा उद्देश पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळे पाडणे आणि दहशतवादाविरुद्ध कठोर संदेश देणे हा होता. आता शस्त्रसंधी (सीझफायर) झाल्यानंतरही भारताने आपल्या पाच प्रमुख निर्णयांमध्ये कोणतीही शिथिलता आणलेली नाही.**




भारताने पहलगाम हल्ल्यानंतर सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिली. हा करार 'अभ्यासाच्या स्थितीत' ठेवण्याचा निर्णय घेतला. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी स्पष्ट केले की, पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादाला पाठबळ पूर्णपणे थांबवत नाही, तोपर्यंत हा करार पुन्हा कार्यरत केला जाणार नाही. हे पाऊल भारताच्या पाणीसंपत्तीवर सार्वभौम अधिकार असल्याचा भाग म्हणून पाहिली जात आहेत. भारताने पाकिस्तानसोबतचा सर्व व्यापारी व्यवहार स्थगित केला आहे. ''ज्यावेळी सीमेपलीकडून देशात होणारा दहशतवाद थांबेल, त्यानंतरच आर्थिक नातेसंबंध सुरू होतील,'' अशी भारताची स्पष्ट भूमिका आहे. सीझफायरनंतरही व्यापार सुरु करण्याबाबत कोणतीही हालचाल झालेली नाही. भारताने पाकिस्तानच्या नोंदणीकृत, चालवलेल्या किंवा भाड्याने घेतलेल्या कोणत्याही विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद केले आहे. या निर्णयाचा उद्देश पाकिस्तानवर धोरणात्मक आणि आर्थिक दबाव निर्माण करणे हाच आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत सरकारने ओटीटी प्लॅटफॉर्म्सना पाकिस्तानमधील कोणताही कंटेंट त्वरित हटवण्याचा आदेश दिला. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार, देशाच्या सुरक्षेसाठी ही पावले महत्त्वाची मानली गेली आहेत.तसेच ऑल इंडिया सिने वर्कर्स पान २ वर

# नऊ महिन्यात पुन्हा उभा राहिला शिवरायांचा ११ फूट उंच पुतळा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते पूजन

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी**

**मालवणमधील राजकोट येथे नव्याने उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते पूजन करण्यात आले. नव्या पुतळ्याने अनावरण न करता पूजन करून दर्शनासाठी तो सर्वांसाठी खुला करण्यात आला. २६ ऑगस्ट २०२४ रोजी हा पुतळा कोसळला होता. विक्रमी वेळेत हा पुतळा** पान २ वर




# अजित पवार नांदेडमधील शहीद जवानाच्या कुटुंबीयांना भेटले

## आई–वडिलांसह वीरपत्नीला दिला सरकारच्या मदतीचा शब्द

**नांदेड । प्रतिनिधी**

जम्मू काश्मीर येथील श्रीनगर येथील अपघातात नांदेडच्या सचिन वनंजे यांना वीरमरण आले. त्यानंतर, त्यांच्या मूळगावी शोकाकुल वातावरणात आणि ग्रामस्थांच्या मोठ्या गर्दीत त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. तसेच, पान २ वर



# युद्धबंदीची माहिती पंतप्रधानांनी सर्वपक्षिय बैठकीत द्यावी

## कॉंग्रेस, डाव्या पक्षांची केंद्र सरकारकडे मागणी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भारत आणि पाकिस्तान यांच्यात जाहीर झालेल्या युद्धबंदीची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने देशातील सर्वपक्षियांबरोबर सामायिक करावी, असे आवाहन करत पुढील वाटचालींच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणीही विरोधकांनी केली आहे.**

कॉंग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, वॉशिंग्टन डी.सी. कडून झालेल्या अभूतपूर्व घोषणा लक्षात घेता, आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वपक्षीय बैठकीचे अध्यक्षपद भूषवणे आणि राजकीय पक्षांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. जयराम रमेश म्हणाले की, पहलगाम येथील क्रूर दहशतवादी हल्ल्यांपासून गेल्या अठरा दिवसांच्या पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५.०० क्विंटल | २,०५० | ३,००० | २,६२१ |
| ज्वारी/हायब्रिड : ७०.०० क्विंटल | १,८०० | २,७५१ | २,३८४ |
| मका/लोकल:९.५० क्विंटल | २,१०० | २,१०० | २,१०० |
| तूर : १५.०० क्विंटल | ६,८३० | ६,८३० | ६,८३० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७०.५० क्विंटल | २,०२० | २,५४५ | २,३११ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ४७.५० क्विंटल | ३,८०० | ४,३०० | ४,१५३ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४६१ | ५,४६१ | ५,४६१ |

# दीड वर्षात अजितदादा मुख्यमंत्री होणार

## माजी खा. खतगावकर यांचे मोठे भाकीत; देवेंद्र फडणवीस दिल्लीत जातील

**नांदेड । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी मुख्यमंत्रिपदावर केलेल्या विधानाची राज्यभरात चर्चा झाली होती. मलाही अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री व्हावं वाटतं, पण योग येत नाहीये, असे अजित पवार हसत–हसत म्हणाले होते. त्यावर आता वेगवेगळ्या नेत्यांच्या प्रतिक्रिया



येत असून एका बड्या नेत्याने मोठे भाकीत केले आहे. अजित पवार हे दिड वर्षात राज्याचे मुख्यमंत्री होतील आणि देवेंद्र फडणवीस हे केंद्रात जातील, असे विधान माजी खा. भास्करराव खतगावकर यांनी केल्याने येत्या काळात राज्यातील राजकीय समिकरणे बदणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

नांदेडमध्ये राष्ट्रवादी पक्षाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात भास्करराव खतगावरकर बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्रिपदावर भाष्य केले. विशेष म्हणजे सध्या मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस हे भविष्यात पान २ वर

### खतगावकर नेमकं काय म्हणाले?

"दादा माझे भाकीत खरे होते. मी अशोक चव्हाण यांना म्हटले होते तुम्ही मुख्यमंत्री व्हाल ते मुख्यमंत्री झाले. दिल्लीच्या सेंट्रल हॉलमध्ये राजकीय चर्चा होते. तिथे अशी चर्चा आहे की येत्या वर्ष–दीड वर्षात देवेंद्र फडणीस दिल्लीला जातील आणि तुम्ही मुख्यमंत्री व्हाल, असे खतगावकर अजित दादांना म्हणाले आहेत. विशेष म्हणजे मुख्यमंत्री झाल्यानंतर तुम्ही नांदेडमध्ये सत्कार घ्यावा अशी विनंतीही खतगावकर यांनी अजित पवार यांना केली.

cmyk

cmyk



अग्रलेख

# पवारांचे धोरण ठरल्याप्रमाणे की नवी खेळी !

ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याचे सुतोवाच करताच पवारांची राष्ट्रवादीही एक होऊ शकते याची जोरदार चर्चा रंगली. खुद शरद पवार यांनीच या चर्चेला तोंड फोडले. अजितदादा किंवा सुप्रिया सुळे शरद पवारांच्या पक्षाचा निर्णय घेऊ शकत नाहीत. पण, त्यांनी धूर्तपणे हे नाव पुढे केले आहे. 'सीर सलामत तो पगडी पचास' हे पवारांचे धोरण कधीच लपून राहिलेले नाही. राष्ट्रवादीचे एकत्रीकरण झाले तर फटका एकनाथ शिंदे यांना बसू शकतो तसा भाजपातील निर्णय प्रक्रियेपासून दूर नेत्यांनाही. पवारांच्या या भूमिकेवर विश्वास ठेवून अजितदादांचा प्रस्ताव येतो का हे पाहणेही महत्त्वाचे ठरणारे आहे.

राजकारणातील काही निर्णय हे प्रतिस्पर्धी किंवा मित्र पक्षांच्या धोरणाकडे लक्ष देऊन केले जातात हे महाराष्ट्राला काही नवीन नाही. मुंबई महापालिकेच्या निमित्ताने राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या बंधूंनी एकत्र येण्याबाबत सुतोवाच केल्यानंतर त्याची प्रतिक्रिया जशी भाजप आणि शिंदे तसेच काँग्रेस आणि शरद पवार राष्ट्रवादीत काय उमटते हेही पाहणे महत्त्वाचे होते. अपेक्षेप्रमाणे पवारांनीच आपले पत्ते खोलले. पण सवयीप्रमाणे संभ्रमही कायम ठेवला. यापूर्वी २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची युती मोडताच राष्ट्रवादीनेही स्वतंत्र लढण्याची भूमिका घेतली. नंतरच्या राजकारणात शिवसेना आणि भाजपची युती होऊन सत्ता येऊ नये म्हणून भाजपने न मागताही पवारांनी सत्तेला पाठिंबा दिला होता. त्यानंतरचा सगळा इतिहास लोकांच्या समोर आहेच. पण या पूर्वपिठिकेनुसार सध्याचेही राजकारण चालू आहे का? हे नजीकच्या काळात स्पष्ट होईलच.

यात आता अजितदादांची भूमिका पवारांशी मिळतेजुळते घेण्याची राहिली तरी इतर घटकांचा त्यांच्यावर दबाव येतो का हे पाहणे महत्त्वाचे. हे राजकारण २०१४ आणि २०१९ च्या राष्ट्रवादीतील राजकारणाच्या ठरलेल्या संहितेप्रमाणेच पुढे चालू आहे का की नवी काही खेळी आहे तेही समजून येईल. देशात इंडिया आघाडी पुन्हा उभी करण्यात पवारांचा मोठा वाटा होता. राज्याच्या महाविकास आघाडीचे ते प्रमुख आधारस्तंभ होते. मात्र या दोन्ही ठिकाणी काय घडले ते लोकांच्या समोर आहे. त्यानंतर बदललेल्या स्थितीत सुरू असलेल्या राजकारणाचा हा दुसरा भाग आहे.

ठाकरे बंधूंनी एकीची भाषा करून ती सुरू केली. त्यांचे आपसात किती जमणार, एकत्रीकरण होणार, मनोमिलन होणार, पडद्याआड अंडरस्टँडिंग होणार की चर्चा पूर्णत: फिस्कटणार हे अजून स्पष्ट झालेले नाही. पण, त्यांनी आपल्या अनुयायी आणि मतदारांचा अंदाज घेताना एकमेकाची मतजमावणी आणि राजकारण अशी दुहेरी संधी साधली आहे. दोघांना खरोखर एकत्र यायचे आहे की आपण आपल्या मतदारांना सुखावण्यात मागे नव्हतो हे दाखवायचे आहे हे स्पष्ट झालेले नाही. पण, याकाळात पवारांच्या पक्षात असलेली चलबिचल लपून राहिलेली नाही. पवारांच्या सुरुवातीपासूनच्या राजकारणाकडे एक कटाक्ष टाकला तर सत्तेत राहून राजकारणाला त्यांचे अनुयायी साथ देतात. त्यामुळेच अजित पवार भाजप सोबत गेले तरी पवारांबरोबर राहिलेल्यांमध्येही पुन्हा भाजप सोबत जावे असे मत मांडणारा एक गट तयार झाला आहे. याचा अर्थ पवारांच्या अनुयायांना पवारांच्या विचारांपेक्षा सत्ता महत्त्वाची आहे. कारण ती नसेल तर बरेच काही गमवावे लागू शकते. परिणामी पवार या वर्गाचे ऐकत आहेत असे फक्त दाखवत आहेत, की सुप्रिया सुळेंसह आपल्या अनुयायांची अडचण दूर करून देत आहेत हे नजिकच्या काळात लक्षात येईल.

# भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह- मेळावा



**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी, बारावी वर्गातील विद्यार्थ्यांचा स्नेह-मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी शिक्षक नेते कल्याणराव वाघमारे हे होते.**

आजच्या धकाधकीच्या युगात मित्रांच्या भेटी दुर्मिळ झाल्याने शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि आपल्या सवंगड्यांना भेटून हितगुज करण्यासाठी हॉटेल नीलकमल बीड येथे रविवार दि.११/५/२००५ रोजी कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथील सन २००७-०८या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह-मेळावा संपन्न झाला. यावेळी आत्माराम बांगर, अरुण खाडे, गजानन आढावू, कल्याण करपे, अविनाश पोकळे, राजकर्ण घरत, ज्ञानोबा डोंगरदिवे, बिबीशन घायाळ, राजेंद्र करवंदे, सतीश बहीर आदींची प्रमुख उपस्थित होती.याप्रसंगी सोमीनाथ भोईटे अंकुश जाधव, मिलिंद धुताडमल, शितल राऊत, आशा जाधव, मोहन गव्हाणे ,सुनील खेत्रे, शकुंतला माने ,शुभांगी पाटोळे ,संपत गव्हाणे ,रंजीत जाधव, सर्वश्री बांगर ,खाडे ,करपे, पोकळे, घरत, घायाळ, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना कल्याणराव वाघमारे म्हणाले की,आजच्या विज्ञान युगात मुलाकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे आपण ज्या ठिकाणी आहोत त्या ठिकाणी विश्वास ठेवून काम केले पाहिजे. दिलेल्या ज्ञानाचा भरपूर उपयोग करा. ज्ञान द्या ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते आपल्या मुलांचे आवडीच्या क्षेत्रात करिअर करा. चांगल्या विचारांची देवाण-घेवाण करा चांगले काम करून विश्वास संपादन करा असे त्यांनी सांगितले. यावेळी अविनाश दाभाडे, निखिल कानडे, रुद्रा कदम, शोभा मराठे, सुरेखा जगताप, लंका चव्हाण, मंदा काळे, शिवकन्या राऊत, रत्नमाला कबाडे, शेख रिना, नंदकिशोर फुलझळके, सचिन कांबळे, किशोर सुरवसे, विष्णू देवकर, विलास तळेकर, राजेंद्र दाभाडे, नारायण मुंजाळ गोविंद मुंजाळ, शाम तळेकर ,संजय वखरे, अमोल काळे, नितीन जाधव, अर्जुन धनवडे ,राम जाधव, बाबासाहेब जाधव, चक्रधर अनभूले, सुभाष भनगे, प्रशांत भोजगुडे, राहुल वाघमारे यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन पल्लवी हाके यांनी केले शेवटी अविनाश दाभाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कर्तव्य दक्षतेशिवाय जीवन सार्थकी नाही-डीवायएसपी विश्वंभर गोल्डे

**बीड । प्रतिनिधी**

कठोर परिश्रमा शिवाय व संस्कारा शिवाय मनुष्य जीवन सार्थकि नाही असे मत बीड पोलीस दलाचे डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांनी महामार्ग पोलीस केंद्र मांजरसुंबा येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक रवींद्र किसनराव नागरगोजे हे पोलीस खात्यात यशस्वीरित्या व निष्कलंक सेवा करून दि. ३० एप्रिल २०२५ रोजी नियत वयोमानानुसार बीड पोलीस दलातून सेवानिवृत्त झाल्याबद्दल दि. १० मे २०२५ रोजी सायंकाळी नगर रोडवरील हॉटेल एम्पायर येथे सेवापुर्ती सोहळ्यात बोलताना व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, प्रशासकीय सेवा करत असताना, अनेक अडचणीला सामोरे जाताना ,कर्तव्यदक्षतेने कठोर परिश्रम घेऊन प्रमाणिक सेवा केल्यास निश्चितच आपले जीवन सार्थकी बनते म्हणूनच आज हे सभागृह पूर्ण भरलेले दिसून येत आहे .जीवनातील काही प्रसंग विनोदी शैलीत सांगून सभागृह हास्य कल्लोळात नाहून निघाले. प्रमुख पाहुणे म्हणून वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा पोलीस दलाचे योग प्रशिक्षक डॉ. संजय तांदळे यांनीही आपले मनोगत थोडक्यात व्यक्त केले. रवींद्र नागरगोजे यांचे चिरंजीव संगमनेर येथे जलसंपदा विभागात



अभियंता म्हणून कार्यरत असलेले सुरज नागरगोजे यांनी आपल्या आई वडिलांविषयी मनोगत व्यक्त करून वडिलावर कविता सादर करून सभागृहातअनेकांच्या डोळ्यात पाणी आणले. त्यांचा दुसरा मुलगा निखिल नागरगोजे केईएम हॉस्पिटल मुंबई येथे एमबीबीएस पूर्ण करून सध्या इंटरशिप करीत आहे त्याने देखील आपले मनोगत व्यक्त केले. रवींद्र नागरगोजे यांची मुलगी स्मिता पुणे येथे राहत असून त्यांचे जावई श्रीकांत आव्हाड हे मंत्रालयात कक्ष अधिकारी म्हणून सध्या कार्यरत आहेत. त्यांचे भाऊ मदन किसनराव नागरगोजे हे सहाय्यक फौजदार म्हणून औरंगाबाद ग्रामीण चिकलठाणा पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहेत. हे देखील सेवापुर्ती कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. आघाव साहेब, मनोहर तांदळे, राम ढोबळे, माणिकराव तांदळे, परमेश्वर पौळ, श्रीकांत आव्हाड, मुकुंद तांदळे ,अच्युतराव तोंडे, थिटे साहेब, गोविंदकर देवा, रंजनाताई तांदळे ,स्नेहा नागरगोजे, श्रिया आव्हाड, आदिनीआपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी रवींद्र नागरगोजे यांचा सपत्नीक आई-वडिलांनी पुष्पहारणे सत्कार करून त्यांना आशीर्वाद दिला. व नंतर मातृभूमी प्रतिष्ठान च्या वतीने डॉ. संजय तांदळे व विजय जाधवर यांनी शाल ,सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. तसेच नातेवाईक व मित्र परिवाराने देखील पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.सूत्रसंचालन भिवराज कोकणे तर आभार मदनराव किसनराव नागरगोजे यांनी मानले. कार्यक्रमास चराठा गावातील प्रतिष्ठित नागरिक, नातेवाईक सह मित्रपरिवार बहुसंख्येने उपस्थित होते.

# सायगावमध्ये शेतमजुर तर सुगावमध्ये विज कोसळून म्हैस ठार





**अंबाजोगाई । प्रतिनिधी**


आज रविवार दि ११ रोजी अंबाजोगाई शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी सायंकाळी ४ च्या सुमारास अचानक पडलेल्या पावसाने नागरिकांची मोठी धावपळ उडाली. यावेळी अनेक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांचा प्रचंड कडकडाटासह धुंवाधार वादळी पाऊस झाला आहे. या वादळी वाऱ्याच्या पावसात सायगाव येथील शेतमजुर सायगाव भारज रस्त्यावरच्या शेतात काम करत असाताना अचानक पाऊस आल्याने जवळच असलेल्या लिंबाच्या झाडाच्या आश्रयाला आले असताना त्याच झाडावर वीज कोसळून शेतमजुर डिगांबर शंकर गायकवाड वय ५९ हे जागीच ठार झाले आहेत. तर सुगाव येथील शेतकरी सत्तार अंबीरखाँ पटेल यांच्या शेतात देखील झाडावर विज कोसळून म्हैस दगावल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दुभती म्हैस दगवल्याने यात शेतकऱ्याचे अंदाजे ८ हजार रूपयाचे नुकसान झाले आहे. सुगावच्या शेतकऱ्याची म्हैस तर सायगाव शिवारात विजेने शेतमजुराचा बळी गेल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान तहसीलदार विलास तरंगे यांच्या आदेशानुसार विज पडून ठार झालेल्या शेतमजुर व म्हशींचा येथील तलाठी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे व पुढील कार्यवाही तसेच शासकीय आर्थिक मदतीसाठी तहसीलदार यांना पंचनामा सादर केला आहे. गावकऱ्यांनी देखील यावर तात्काळ कारवाईचे करून आर्थीक मदत करण्याची मागणी केली आहे.

# वाळू माफियाकडून तहसीलदारांना जीवे मारण्याचा प्रयत्न

## तहसीलदाराने गोळीबार केल्यामुळे वाचला जीव

**अंबड । प्रतिनिधी**

अंबडचे प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार विजय लक्ष्मण चव्हाण ११ मे रोजी पथकासह तहसीलदार गोदावरी नदीपात्रातुन होणारी अवैध वाळू उत्खनन रेखण्यासाठी नदी पात्रामध्ये गेले होते. शहागड येथे ट्रक्टर मार्फत वाळू उपसा सुरु आहे याकरता कारवाई करण्यासाठी चालक संतोष दत्ता घोडके तसेच पथकामधील रमेश भानुदास वालेकर व राजेश चव्हाण असे सदर ठिकाणी गेलो होते मी शहागड येथील पुलावरून पाहिले असता ०६.४५ वा. सुमारास या ठिकाणी १५ व्यक्ती हे ०३ ट्रक्टरमध्ये अवैध वाळु भरण्याचा काम करीत असताना आम्हाला पहुन पळून गेले यानंतर ट्रक्टर क्र २०७८३२ महिंद्रा अर्जुन ट्रॅक्टरवरील चालक ईशान इब्राम खान रा तहसिल कार्यालयाच्या बाजुला, गेवराई जि. बीड यानं संतोष दत्ता घोडगे यास ट्रक्टर पकडत असतांना त्यास ढकलुन दिले त्यात त्याच्या हाताला व गुडघ्याला मार लागला. त्यांनंतर मी सदर ट्रॅक्टर थांबविण्याचा



प्रयत्न करित असताना सदर ट्रॅक्टर माझे अंगावर टाकण्याचा प्रयत्न केला मी बाजुला पळाल्याने माझ्या अंगावर लाठ्या काठ्या घालण्याचा प्रयत्न केला व माझेकडे धावुन आले व मला एकट्याला घेरल त्यांनी मला म्हणाले की आज तुला बघतो ''अशी धमकी देत माझे अंगावर येत असताना मला जिवाची भीती वाटली, सदर इसम मला मारहाण करतील व जीवच मारून टाकतील यामुळे मी माझे जवळील खाजगी पिस्तल हवेमध्ये ४ फायरिंग केल्या केले त्यामुळे माझा जीव वाचला व वाळू माफिया पळून गेले. ट्रॅक्टर चालक इशाने ब्रान खान व तीन अनोळखी व्यक्ती तेथुन दोन ट्रॅक्टर घेवुन पळुन गेले. जातांना त्यापैकी एक ट्रॅक्टर सोबत घेवुन पळाले व दोन ट्रॅक्टर आम्ही व आमच्या पथकाने जागीच पकडले. त्यानंतर आम्ही लगेच आमच्या मोबाईलने दोन वेळा ११२ या क्रमांकावर पोलीस मदतीसाठी कॉल केला. आम्ही सदर ठिकाणावरून दोन वाळुने भरलेले ट्रॅक्टर हे पकडुन तहसिल कार्यालय अंबड येथे. लावलेले आहेत ५,५५,०००/- एक महिंद्रा कंपनीची ५५५ अर्जुन ट्रॅक्टर ज्याचा क्रमांक २०७८३२ असा असलेला तसेच दोनचाकी ट्रॉली विना नंबरची व त्यात १ ब्रास अवैध उपसा केलेली वाळु असे एकूण ५,५५,००० रु. चा माल २)५,५५,०००/- एक महिंद्रा स्वराज कंपनीची ७४४ अर्जुन टैक्टर ज्याचा क्रमांक २३६००८ असा असलेला तसेच त्यास अक दोनचाकी ट्रॉली विना नंबरची व त्यात १ ब्रास अवैध उपसा केलेली वाळू असे एकूण ५,५५,००० रु. चा माल एकुण ११,१०,००० रु असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी इशान इब्रान खान रा गेवराई व सोबत ३ अनोळखी व्यक्तींनी आमच्यावर हल्ला करून शासकीय कामात अडथळा केला त्याचप्रन्नागे मला तेथे असलेले इशान इबान खान रा गेवराई सोबत ३ अनोळखी यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

# पान १ वरून...

### स्थानिक नैसर्गिक आपत्तीची

या घटकाअंतर्गत मोठ्या प्रमाणावर तक्रारीही होत्या. तांत्रिकदृष्टया या तक्रारी सोडविणे अशक्य झाल्याने देखील ही अट काढून टाकण्यात आल्याचे कृषी विभागातील सूत्रांचे म्हणणे आहे. राज्य सरकारने खरीप २०२३ पासून पंतप्रधान खरीप पीकविमा योजना केवळ एक रुपयात शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिली. त्यामुळे शेतकऱ्यांचा प्रतिसाद तब्बल दहा पटींनी वाढला. स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पिकांचे नुकसान या घटकाअंतर्गत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई चांगल्या पद्धतीने मिळत असल्याने हा प्रतिसाद वाढला होता. मात्र, त्यासाठी शेतकऱ्यांना नुकसानीची सूचना द्यावी लागत होती. २०२३ च्या खरीप हंगामात या घटकाअंतर्गत ४६ लाख, तर २०२४ च्या खरीप हंगामात तब्बल ९२ लाख सूचना आल्या होत्या. प्रत्येक सूचनेची प्रत्यक्ष शेतावर जाऊन पडताळणी करणे, त्यानुसार नुकसानभरपाई ठरविणे, हे जिकिरीचे काम होते. त्यामुळेच नुकसान झाल्यानंतरही भरपाई मिळत नाही, अशी शेतकऱ्यांची तक्रार होती. दुसरीकडे राज्य सरकारकडून विमा कंपन्यांना मात्र हप्ता न चुकता मिळत होता. याचा रोषदेखील शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येत होता.

----------

### शस्त्रसंधीनंतरही भारताचा

असोसिएशनने पाकिस्तानच्या कलाकारांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. याशिवाय अनेक पाकिस्तानी कलाकारांचे सोशल मीडियावरील अकाउंट्स (उदा. हानिया आमिर, फवाद खान, माहिरा खान, अली जफर इत्यादी) भारतात बंद करण्यात आली आहेत. 'अबीर गुलाल' हा फवाद खान अभिनीत हिंदी चित्रपट भारतात प्रदर्शित होणार होता, पण त्यावर बंदी घालण्यात आली आहे. भारत सरकारने सर्व प्रकारचे व्हिसा पाकिस्तानच्या नागरिकांसाठी रद्द केले असून नवीन व्हिसा सेवा थांबवली आहे. काही विशेष श्रेणी वगळता (उदा. हिंदू व शीख अल्पसंख्यांक), सर्व पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा त्वरित रद्द करण्यात आले आहेत. तसेच अटारी-वाघा सीमारेषा सामान्य नागरिकांसाठी बंद ठेवण्यात आली आहे. भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना परत जाण्यासाठी निश्चित कालावधी देण्यात आला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताची धोरणात्मक भूमिका ही केवळ सीमारेषेवरील गोळीबार थांबवण्यापुरती मर्यादित नसून, दहशतवादास पाठबळ देणाऱ्या देशावर बहुआयामी दबाव टाकण्याची आहे. सीझफायर हे एक सामरिक पाऊल असले तरीही, भारताच्या या कठोर उपाययोजनांतून पाकिस्तानला एक स्पष्ट संदेश दिला गेला आहे. शांतता ही केवळ गोळीबार थांबल्याने नव्हे, तर दहशतवाद संपवण्यानेच शक्य आहे असा तो संदेश आहे.

------------

### १०० दहशतवादी, ४०

आयसी ८१४ हायजॅक आणि पुलवामा हल्ल्याशी संबंधित होते. दहशतवादी तळांची सखोल तपासणी केल्यानंतरच त्यावर हल्ल्याचा निर्णय घेतला गेला. यात बहुतांश ठिकाणं रिकामी केली गेली होती. मात्र जिथे अद्याप दहशतवादी होते अशी ९ ठिकाणे आम्ही निवडली असेही लष्कराने सांगितले. डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरचा उद्देश फक्त दहशतवाद्यांना संपवणे हा होता. भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत हल्ला केल्यानंतर पाकिस्तानकडून गोळीबार आणि ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला गेला. याला भारताने प्रत्युत्तर देताना पाकिस्तानी लष्कराच्या ३५ ते ४० जवानांचा मृत्यू झाल्याचेही भारतीय लष्कराने सांगितले. भारतीय हवाई दलाच्या एअर डिफेन्स सिस्टिमने पाकिस्तानचे सर्व हल्ले हाणून पाडल्याचे भारताच्या लष्कराने पत्रकार परिषदेत सांगितले.

------------

### अजित पवार नांदेडमधील शहीद

सरकारला जे शक्य आहे, ते तुमच्या कुटुंबीयांसाठी करू, असे आश्वासनही दिले. भारत - पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर ६ मे रोजी जम्मू काश्मीर येथील श्रीनगर येथे आठ फूट खोल दरीत वाहन कोसळल्याने त्यावेळी ड्युटीवर असलेल्या नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील २९ वर्षीय सचिन वनंजे यांचा मृत्यू झाला होता. तांत्रिक बाबी पूर्ण झाल्यानंतर सचिन यांचे पार्थिव देगलूरला आणण्यात आले. त्यावेळी पत्नी, भाऊ आणि आई - वडिलांसह उपस्थितांना अश्रू अनावर झाले होते. देगलूर येथे त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधींसह हजारो नागरिक अंत्यविधीला उपस्थित होते. आपल्या आठ महिन्याच्या मुलीला कडेवर घेऊन सचिन वनंजे यांच्या पत्नीने शहीद पतीला अखेरचा निरोप दिला. हृदय पिळवटून टाकणारं हे दृश्य पाहून अनेकांचे डोळे पाणावले. दरम्यान, अजित पवार यांनी भेट दिल्यानंतरही कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले. आम्ही दोघेजण एज्युकेटेड आहोत, त्यामुळे मला आणि माझ्या दिराला नोकरी मिळाली पाहिजे अशी मागणी वीरपत्नीने सरकारकडे केली आहे. दरम्यान, यावेळी गावात शहीद सचिन वनंजे यांचे स्मारक उभारण्यात येईल, त्यासंदर्भातही उपमुख्यमंत्र्यांनी स्थानिक नेत्यांसोबत चर्चा केली.

----------

### नऊ महिन्यात पुन्हा उभा राहिला

उभा करण्यात आला असून यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे आजी- माजी मंत्री आणि अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. तसेच शिल्पकार राम सुतार यांचेही मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले आहे. राजकोट किल्ल्याजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला होता. मराठा नौदल आणि शिवरायांच्या सागरी संरक्षण-सुरक्षेच्या वारशाचा गौरव हा या मागचा हेतू होता. ०४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनानिमित्त या पुतळ्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते अनावरण करण्यात आले होते. मात्र अवघ्या नऊ महिन्यात हा पुतळा कोसळला होता. देशभरातून या घटनेवर संताप व्यक्त होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही या घटनेसाठी महाराष्ट्रातील जनतेची माफी मागितली होती. याच ठिकाणी पुन्हा पुतळा साकारण्याचे काम तातडीने केले जाईल, असे आश्वासनही महायुती सरकारने दिले होते. अखेर ९ महिन्यात या पुतळ्याचे काम पूर्ण झाले असून, रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, खासदार नारायण राणे, पालकमंत्री नितेश राणे आदी नेते उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना प्रतिक्रियाही दिली. ते म्हणाले, विक्रमी वेळेत हा पुतळा उभा करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिनंदन. आजी-माजी मंत्री यांनी वेगवान वेळेत ही प्रक्रिया पूर्ण केली. वादळाचा अभ्यास करून पुतळ्याची रचना करण्यात आली असून ९१ फुटांचा हा पुतळा आहे. यातील चबुतरा हा १० फुटांचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा देशातला सर्वात उंच पुतळा आहे. पुढची १०० वर्ष हा पुतळा कोणत्याही प्रकारच्या वातावरणात टिकेल अशी रचना करण्यात आली आहे. पुढील १० वर्ष पुतळ्याची जबाबदारी पुतळा उभारणाऱ्यांकडेच असेल. आयआयटी मुंबई आणि शिल्पकार राम सुतार यांनी कितीही जोराचे वादळ आले तरी पुतळ्याला काही होणार नाही याची दक्षता घेतली आहे, अशी ग्वाहीदेखील मुख्यमंत्र्यांनी दिली.

**पुतळ्यासाठी २१.९ कोटी रुपयांचा खर्च**

शिवाजी महाराजांचे शिल्प हे राम सुतार यांनी साकारले आहे. तर या पुतळ्याचे काम त्यांचे पूत्र अनिल सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. नोएडातील कंपनीत पुतळा तयार करण्यात आला असून त्यासाठी सुमारे २१.९ कोटी रुपये एवढा खर्च आला आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये या पुतळ्याचे काम सुरू करण्यात आले होते.

-------------

### युद्धबंदीची माहिती पंतप्रधानांनी

घटनांवर चर्चा करण्यासाठी आणि पुढील वाटचाल कशी करावी यावर चर्चा करण्यासाठी आणि सामूहिक निर्धार दाखविणे, दर्शविण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची गरज आहे. दुसरीकडे एका पत्रकार परिषदेत सीपीआयचे सरचिटणीस डी राजा म्हणाले की त्यांच्या पक्षाने सतत युद्धबंदीचा पुरस्कार केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एक्स वरील पोस्टचा स्क्रीनशॉट शेअर करताना डी राजा म्हणाले, आम्हाला विश्वास आहे की भारत आणि पाकिस्तानमध्ये डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकेच्या हस्तक्षेपाशिवाय त्यांचे प्रश्न द्विपक्षीय पद्धतीने सोडवण्याची परिपक्वता आहे. पंतप्रधान मोदींनी राष्ट्राला आणि आपल्या लोकांना हे सांगावे की अमेरिकेने 'मध्यस्थी' काय केली? भारत आणि पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांनी त्याला दुजोरा देण्यापूर्वीच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ही घोषणा केली होती, असे सीपीआय (मार्क्सवादी-लेनिनवादी) दीपंकर भट्टाचार्य यांनी निदर्शनास आणून दिले.

----------

### दीड वर्षांत अजितदादा

दिल्लीत जाणार आहेत, असेही भाकीत त्यांनी केले आहे. अजित पवार यांनी काही दिवसापुर्वी मुख्यमंत्रीपदाबाबत वक्तव्य केले होते. त्यावर सुनिल तटकरे आणि त्यानंतर काँग्रेसच्या नेत्याने सुध्दा विधान करीतअजित पवार हे मुख्यमंत्री होतील, असे सांगितले होते. आता माजी खा. भास्करराव खतगावकर यांनी अजित पवार कधी मुख्यमंत्री होतील, हेच सांगून टाकले असून फडणवीस हे दिल्लीला जाणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे खरचं येत्या काळात राज्यातील राजकीय समिकरण बदलते का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. १२ मे २०२५


## राष्ट्रीय लोकअदालतमध्ये ६९० प्रकरणे निकाली

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १० मे २०२५ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकून ६९० प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण १०३०६ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ३८९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण १४८५८ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३०१ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण ६९० प्रकरणे निकाली निघाली आहेत व यामध्ये ५ कोटी ८४ लाख ७३ हजार १५८ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत. सदरील लोक न्यायालयाच्या प्रसंगी जी. जी. सोनी, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह, श्रीमती. एस. आर. पाटील , जिल्हा न्यायाधीश -१, श्रीमती एस.आर.शिंदे , जिल्हा न्यायाधीश, के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश ४ तसेच इतर पॅनल प्रमुख, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष आर.डी.येवले यांच्यासह वकील संघाचे सर्व पदाधिकारी जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# मराठीचे संवर्धन मराठी माणसाने केले पाहिजे -प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर

**ज्योतिराम पांढरपोटे । माजलगाव (प्राचार्य रा.रं.बोराडे साहित्य नगरी)**

**मराठी भाषा टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आली आहे. मराठीचे संवर्धन मराठी माणसाने केले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी केले.माजलगाव येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या निसर्गरम्य परिसरात आयोजित १६ व्य शिवार साहित्य संमेलनाच्या उद्घाटक म्हणून डॉ.दीपा क्षीरसागर बोलत होत्या. त्यावेळी संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार, मराठवाडा साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य अनंत कराड, निमंत्रित सदस्य प्रभाकर साळेगावकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य देविदास फुलारी, स्वागताध्यक्ष भारत होके,मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, उपाध्यक्ष प्रा.स्नेहल पाठक, कार्यवाह डॉ. भाऊसाहेब राठोड, कोषाध्यक्ष किशोर गुंजकर यांची उपस्थिती होती.**



यावेळी बोलताना प्राचार्य डॉ दीपाताई क्षीरसागर म्हणाल्या की मराठवाडा साहित्य परिषद शाखेने कार्यक्रमाचे सातत्य ठेवले आहे. मसापच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक साहित्यिक उपक्रम घेतले जातात. या साहित्य संमेलनामुळे कलावंतांना, साहित्यिकांना संधी मिळते. नवोदित साहित्यिकांना सल्ला देताना त्या म्हणाल्या की, नवोदित साहित्यिकांनी सुरुवातीला वाचन केले पाहिजे. शेतीमातीत काम करणारा शेतकऱ्याचा मुलगा अस्सल साहित्य लिहू शकेल. इंद्रजीत भालेराव, रा रं. बोराडे, आनंद यादव, प्रा.भास्कर चंदनशिव, श्रीकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा साहित्यात मांडल्या. आज शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. आधुनिकीकरणामुळे कृषी जीवन उद्ध्वस्त होत आहे. लोक पुणे, मुंबईकडे जात आहेत. बेकारी वाढली आहे. शिक्षण घेऊन तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मुले आई-वडिलांना सांभाळत नाहीत. शेतकऱ्यांचे विजेचे प्रश्न सोडवले पाहिजेत. अंधश्रद्धा, बालविवाह, शेतकऱ्यांचे प्रश्न साहित्यिकांनी मांडले पाहिजेत. शेतकऱ्यांचे महत्त्व वाढले पाहिजे, कारण शेतकरी पोटाला दाणे देतात. शेतकऱ्यांची मुलं काय करतात याकडे लेखकांनी लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्याच्या मुलांनी शिक्षण घेऊन नैपुण्य प्राप्त केले पाहिजे. आणि स्वतःच्या पाया उभे राहिले पाहिजे. दंगडलीत गरिबांच्या मुलाचा बळी जात आहे. त्यामुळे मुलांनी अभ्यास करावा, शिक्षण घ्यावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी कवी स्वप्नील चौधरी यांची चल दंगल समजून घेऊ ही कविता सादर केली. तरुणांनी स्वावलंबी बनावे असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी संमेलनाध्यक्ष ना.मा. पडलवार म्हणाले की , बीड जिल्ह्याला सकारात्मक अंगाने पुढे आले पाहिजे. तरुणांनी वाचन केले पाहिजे. प्रत्येकाच्या घरात किमान ५० पुस्तकांचे संग्रहालय असावे. आपण सर्वांनी मतभेद विसरून जवानांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे . यावेळी प्रभाकर साळेगावकर ,अनंत कराड, भारत होके यांची समायोचित भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार खेलबा काळे यांनी मांनले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गीता होके व त्यांच्या संचाने पुष्पांजली व गणेश कौतुकम हे कथ्थक सादर केले. कुणाल कुलकर्णी, ऋषिकेश पडलवार यांनी मराठी गीत सादर केले. यावेळी गेणू शिंदे,गौरी देशमुख, प्रा. संगीता जाधव, बालासाहेब झोडगे, प्रा.डॉ.उमेश साडेगावकर,डॉ. प्रज्ञा जोशी,स्मिता लिमगावकर, डॉ. मीनाक्षी निळेकर, रामकिसन सोळंके , अभय होके पाटील, नारायण होके, बंडू शेजुळ, शिवाजीराव शेजूळ, बालाप्रसाद चव्हाण, मोहन राठोड, विठ्ठलराव सोळंके, गोविंद बजाज ,सतीश दुगड, डॉ. राजेश रुद्रवार ॲड.सतीश शिंदे, आनंद मोगरेकर, संदीप शिनगारे, रामानंद भंडारी, जगदीश पोपळे यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### शिवार साहित्य संमेलनात पुढील वर्षापासून बाल साहित्य पुरस्कार

सोळाव्या शिवाय साहित्य संमेलनामध्ये पुढील शिवार साहित्य संमेलना पासुन राज्यस्तरीय ''बालसाहित्य पुरस्कार'' ज्याचे स्वरूप रू. ३००१/-

सन्मानचिन्ह व शाल,याप्रमाणे देण्याची उद्धोषणा माजलगाव मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने करण्यात आली.

कवी भूषण प्रभाकर साळेगावकर प्रायोजित हा पुरस्कार राज्यातून निवडण्यात येणाऱ्या उत्कृष्ट बाल साहित्यिकाला देण्यात येणार आहे.

### शिवार साहित्य संमेलनाची ग्रंथ पुजनाने सुरुवात

रा.रं बोराडे साहित्यनगरीत रविवारी आयोजित १६ व्या शिवार साहित्य संमेलनाची सुरुवात श्री ह. भ.प. आदिनाथ महाराज कुंडकर यांच्या हस्ते ग्रंथ पूजनाने झाली.यावेळी संमेलनाध्यक्ष ना. मा. पडलवार, उद्घाटक प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, स्वागताध्यक्ष भारत होके, म. सा. प. शाखेचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, उपाध्यक्ष प्रा. स्नेहल पाठक , सहकार्यवाह डॉ. भाऊसाहेब राठोड ,कोषाध्यक्ष किशोर गुंजकर, सहकार्यवाह बालासाहेब झोडगे, प्रा डॉ उमेश साडेगावकर, प्रतिभा थिगळे, प्रकाश पत्की,प्रा. डॉ.रमेश गटकळ यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### शिवार साहित्य संमेलनातील ठराव

१) अंबाजोगाई येथे मराठी भाषेच्या विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे. २) पुरुषोत्तमपुरी येथील पुरुषोत्तमाच्या मंदिराला ब+ दर्जा देण्यात यावा. ३) गावोगावच्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या सर्व शाखांना जागा व इमारत उपलब्ध करून देण्यात यावी. ४) शिवार साहित्य संमेलनासारख्या लहान साहित्य संमेलनाना अनुदान देण्यात यावे. ५) शालेय शिक्षणात पहिल्या वर्गा पासून इतर भाषा विषयापेक्षा मराठी भाषा प्रथम प्रधान्याने शासनाने अनिवार्य करावी ६) पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद, सैनिकी कारवाई यांचा निषेध.

## जिल्हाध्यक्ष राऊत आणि ग्रामसेवक घाडगे यांचा सत्कार!

बीड । प्रतिनिधी

माळी समाजाची अग्रगण्य संघटना म्हणजे सावता परिषद होय.सावता परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी श्री किशोर राऊत यांची पुनर्नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्या अर्थात सावता प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना राऊत म्हणाली की,अल्पावधीतच सावता प्रतिष्ठानने माळी समाजात जागृती आणि ईर्षा निर्माण केलेली आहे.सुसंस्कृत आणि जागृक नागरिक निर्माण करण्याचे हे एक निर्मळ व्यासपीठ तयार झाले आहे. आतापर्यंत प्रतिष्ठाने समाजाच्या बैठका,गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,महापुरुषांच्या जयंती,



पुण्यतिथी कार्यक्रम, समाजातील आदर्श गुणवान नागरिकांचा सत्कार असे विविध कार्यक्रम घेतले आहेत. सावता महाराजांचे हे केवळ मंदिर नसून महाराजांना अपेक्षित असणारा कर्मप्रधान संस्कृतीवर आधारित समाज निर्मितीचा संकल्प साकार करणारे हे एक विचारपीठच आहे असे गौरवोद्गार नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष किशोर राऊत यांनी काढले आहेत. मंगल कार्यालय, छोटे वस्तीगृह, जिम,वाचनालय हे उपक्रम पूर्ण करण्याचा निर्णय मंदिर ट्रस्टने घेतला आहे. सावता परिषद आणि आमचे नेते संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे या मंडळीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील अशी ग्वाही यावेळी राऊत यांनी दिली.

प्रारंभी ट्रस्टच्या वतीने श्री किशोर राऊत आणि राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श ग्रामसेवक श्री रामेश्वर घाडगे यांचा हृदय सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महादेवनाना दुधाळ हे होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी ट्रस्टने केलेल्या कामांचा आढावा घेतला. भाविकाळात घ्यावयाच्या उपक्रमाबद्दल माहिती दिली. माळी समाजाच्या सहकार्यानेच हा वटवृक्ष होत आहे असे सांगून ते म्हणाले की राज्यकर्त्या मंडळींनी आता सावता प्रतिष्ठानला सहकार्य करण्याची गरज आहे. आणि आपण ते सहकार्य घेत आहोत.

कार्यक्रमास सर्व विश्वस्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्री श्यामसुंदर घाडगे यांनी केले.

## युवा नेते अक्षय मुंदडाची संवेदनशीलता

### युध्दजन्य परिस्थितीमुळे वाढदिवसाचे कार्यक्रम रद्द केले, चला हवा येऊद्या कार्यक्रम पुन्हा होणार, शहराध्यक्ष संजय गंभीरे यांची माहिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम देशात सुरू असलेल्या युध्दजन्य परिस्थितीमुळे रद्द केले असून कुठलेही जाहीर कार्यक्रम होणार नसल्याचे संयोजकांनी सांगितले. दरम्याण चला हवा येऊ द्या आणि मराठी पाऊल पडतेत पुढे. दोनही कार्यक्रम युध्द संपल्यानंतर निश्चित घेवू अशी माहिती भाजपा चे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी दिली. राजकारण करताना देशभक्तीतली संवेदनशिलता कशी जपल्या जाते याचे आदर्श उदाहरणच म्हणावे लागेल.**

उद्याच्या १३ मे रोजी भाजपा चे युवा नेते अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस असून त्यानिमित्ताने शहरात कार्यकर्त्यांनी विविध कार्यक्रमाचे केले होते. ज्यामध्ये चला हवा येऊद्या, प्रसिध्द अभिनेते निलेश साबळे यांचा कार्यक्रम तर मराठी पाऊल पडते पुढे आदी सांस्कृतिक कार्यक्रम १३ मे ला शहरात होणार होता. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पुर्व तयारी जोरदार केली होती. त्यासाठी मध्यवर्ती असलेल्या सेंट अँथोनी शाळेचे मैदान पण निवडले होते. मात्र दोन दिवसापासून पाकिस्थान सोबत सुरू झालेले युध्द त्यानंतर संपूर्ण देशात निर्माण झालेल्या युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अक्षय मुंदडा यांनी स्वतःच वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम रद्द करण्याच्या सुचना आपल्या सहकारी कार्यकर्त्यांना केल्या असून कोणीही मोठा गाजावाजा करत कार्यक्रम करू नये असे सांगितले त्यामुळे चला हवा येऊद्या हा कार्यक्रम रद्द करण्यात आला. दरम्याण सद्यस्थितीत कार्यक्रम रद्द झाला असला तरी, याच सांस्कृतीक कार्यक्रमाची मेजवाणी आम्ही निश्चितच युध्दजन्य परिस्थिती संपल्यानंतर शहरवासियांना देणार असल्याचे भाजपाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी सांगितले. दि. २२ एप्रिल रोजल पाकिस्थानी दहशतवादी पहलगाम येथे दुष्कर्म घडवले होते ज्यांला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली दृढ निश्चय तथा सैनिकाच्या शौर्याने योग्य उत्तर देणे चालू आहे. मात्र या सर्व पार्श्वभूमीवर वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचे मुंदडांनी कळवत आपल्यातली संवेदनशीलता दाखवली.

# 'निनगुर गावका कणकण बोले जय बंकटस्वामी महाराज' भजनाने कथा मंडप भावविभोर

### भक्ती सूर्य संत बंकटस्वामी कृपा प्रकाशाने ईश प्राप्ती होते - स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज देवगडकर

**बीड । प्रतिनिधी**

''निनगुर गावका कणकण बोले जय बंकटस्वामी महाराज'' भजनाने श्रीमद्? भागवत कथा मंडप भावविभोर झाला. संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात सुरू असलेल्या भव्य श्रीमद्? भागवत कथेचा मोठ्या थाटात सांगता झाली.यावेळी बोलताना भक्ती सूर्य संत बंकटस्वामी कृपा प्रकाशाने ईश प्राप्ती होते. असे प्रतिपादन

कथाव्यास स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज देवगडकर यांनी केले. स्वामींच्या पुण्यभूमीत कथा करण्याचा भाग्य मिळालं. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे प्रेम मिळाले. असे गौरवोद्गार महाराजांनी बोलून दाखवले.यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प राम महाराज डोंगर, श्री ह भ प श्रीहरी महाराज पवार,श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती, कृष्णा महाराज वाघुले श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश म जाधव यांच्यासह हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवत कथाकार स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून सुरू असलेल्या



कथेची सांगता झाली. सहा दिवस भगवंताच्या दशावताराची कथा ,भागवत महात्म्य , भक्ताची लक्षणे, भक्तीचे प्रकार, देवाला आवडणारा भक्त,गोकुळातील गोपीची भक्ती गोकुळातील रास लीला, देवाला आवडणारी साधना,मधुर बासरी, गोपाळांच्या भूमिकेतून वैकुंठ आणि वृंदावन याचा फरक रास लीला, गोपी सारखी भक्ती , गोपीभावाने केलेली भक्ती देवाला आवडते. गोपीना अहंकार झाला देव त्यांना दूर करतो.. अहंकार देवाला चालत नाही.. महारासलीला.. कंस वध, सुदामाचरित्र कथा सांगितली. यावेळी कथा मंडप भक्ती रसात न्हाऊन निघाला होता.

अरे द्वार पालो कन्हैया से कह दो की दर पे सुदामा गरीब आया है.!

हा कथा प्रसंग सांगताना मित्र प्रेम सुदामा आणि भगवान कृष्ण यांचे प्रेम अवर्णनीय आहे. तसेच सत्ता संपत्ती तारुण्य आणि सौंदर्य या गोष्टी सोबत विवेक असला पाहिजे..चांगले मित्र चांगले चित्र चांगले चरित्र हे आदर्श जीवनाचे सूत्र आहे. असे जीवन जगण्याची भागवत कथेतील सूत्र महाराजांनी सांगितले.

यावेळी कथेत साथ सांगत लक्ष्मण महाराज नागरे (गायक),सचिन महाराज पवार (गायक),विष्णू महाराज घुने (अक्टोपॅड) दत्तात्रय महाराज तापकिरे (सिंथसायझर),संदीप महाराज नरके (तबला),दादा महाराज साबळे ( मृंदग) शिवम महाराज तोडकर (सनई शहनाई) शुभम महाराज बनकर ,सोमनाथ महाराज पानकडे यांची लाभली.. स्व संतोष देशमुख याचे बंधू धनंजय देशमुख यांनी अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचा भेट दिली..यावेळी भागवत कथेत श्रद्धांजली वाहण्यात आली. तसेच देशमुख कुटुंबाला दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे.साधू संतांच्या महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत न्यायाच्या लढाईत प्रत्येक भाविक सोबत आहे. संपूर्ण महाराष्ट्र हळहळला.. न्याय मिळाला पाहिजे. अशा भावना व्यक्त केल्या.

# कलावंत व साहित्यिकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री ज्ञान सरस्वती मंदिराचा कलशारोहण सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मूर्ती प्राणप्रतिष्ठा गानसरस्वती किशोरीताई आमोणकर यांच्या हस्ते संपन्न झाली होती आणि आता कलशारोहण त्यांच्याच पटशिष्या विदुषी विद्याताई भागवत यांच्या हस्ते संपन्न होत आहे.

किशोरीताईनी रचिला पाया विद्याताई झालीयासे कळस... असा दुर्मिळ योग

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकमेव असणारे सर्व कलावंतांचे व साहित्यिकांचे आराध्य दैवत श्री ज्ञान सरस्वती मंदिर लातूर या ठिकाणी दि.१३ मे २०२५ रोजी गान सरस्वती किशोरीताई अमोल कर यांच्या ज्येष्ठ शिष्या श्रीमती विदुषी विद्याताई भागवत यांच्या शुभहस्ते कलशारोहण सोहळा संपन्न होत आहे. विशेष म्हणजे या ज्ञान सरस्वती मंदिरातील



सरस्वती मातेची प्राणप्रतिष्ठा श्रीक्षेत्र बासर येथील ब्रह्मवृंद व गानसरस्वती किशोरीताई आमोणकर यांच्या शुभहस्ते व उपस्थितीमध्ये संपन्न झाला होता. दिनांक १३ मे रोजी श्री ज्ञान सरस्वती मंदिर बार्शी रोड लातूर या ठिकाणी सकाळपासूनच ब्रह्म वृद्धांच्या उपस्थितीत किशोरीताईंच्या ज्येष्ठ शिष्या श्रीमती विदुषी विद्याताई भागवत यांच्या शुभहस्ते कलशारोहण समारंभाला प्रारंभ होईल. याप्रसंगी मराठवाडाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक कलावंतांची उपस्थिती असणार आहे. माझे आराध्य माझे गुरु आणि हेच अंतिम सत्य आहे अशी गुरुप्रती प्रचंड श्रद्धा असणाऱ्या श्रीमती विदुषी विद्याताई भागवत प्रथमच कलशारोहण सोहळ्यानिमित्त लातूर नगरीमध्ये येत आहेत. साक्षात्कारी सुर आणि एकांतिक लय अशा द्वोतातूनच साधकाला समाधीस्थ अद्वैताची अनुभूती करून देणाऱ्या जयपुर अथ्रोली घराण्याच्या त्या गायिका आहेत. संगीत सम्राट उस्ताद अल्लादिया खान गाणं तपस्विनी मोगूबाई कुर्डीकर आणि गानसरस्वती किशोरीताई आमोणकर अशा



घवघवीत पिढीजात श्रीमंतीने वाहणाऱ्या प्रतीत यश घराण्याचे ज्ञानतीर्थ प्राशन केलेल्या विदुषी म्हणजे विद्याताई भागवत. श्री ज्ञान सरस्वती मंदिर लातूरच्या कलशारोहण सोहळ्यानिमित्त श्रीमती विदुषी विद्याताई भागवत यांच्या स्वर्गीय गायनाचा रसास्वाद लातूर तसेच मराठवाड्यातील रसिकांना मिळणार आहे. दि. १३ मे रोजी सायंकाळी ठीक सहा वाजता श्री ज्ञान सरस्वती मंदिर संस्थान बार्शी रोड लातूर या ठिकाणी श्रीमती विदुषी विद्याताई भागवत यांच्या गान परिमळू या शास्त्रीय संगीताच्या सुरेल मैफिलीस प्रारंभ होणार आहे. या मैफिलीमध्ये हार्मोनियमची साथ संगत सूरमणी पं. बाबुराव बोरगावकर, स्वर साथ मधुवंती बोरगावकर तानपुरासात श्री हिमांशू सुबंध व तबला साथ प्रसन्न भुरे यांची असणार आहे. सुरमई पं. बाबुराव बोरगावकर यांच्या अथक परिश्रमातून व सरस्वती मातेवरच्या अत्यंत पराकोटीच्या निष्ठेतून श्री ज्ञान सरस्वती मंदिराची उभारणी झालेली आहे. नवीन जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील बार्शी रोड लगत असणाऱ्या या ज्ञान सरस्वती मंदिराचा परिसर अत्यंत नयनरम्य बनवण्यात आलेला असून तीन हजार रसिक श्रोत्यांची बैठक व्यवस्था असणारा अप्रतिम सभा मंडप ज्ञान सरस्वती मातेच्या समोर उभारण्यात आलेला आहे. सर्व सुविधांनी युक्त व्यासपीठाची रचना केलेली असून भारतातील कोणीही प्रतिष्ठित अथवा नवखा कलावंत ऐनवेळी त्या ठिकाणी येऊन आपली कला ज्ञान सरस्वती माते समोर सादर करू शकतो अशी व्यवस्था श्री ज्ञान सरस्वती मंदिर संस्थान लातूरच्या वतीने करण्यात आलेली आहे. संपन्न होणाऱ्या कलशारोहण सोहळ्यासाठी व सायंकाळी ठीक सहा वाजता संपन्न होणाऱ्या श्रीमती विदुषी विद्याताई भागवत यांच्या गानपरीमळू या कार्यक्रमासाठी सर्व रसिकांनी उपस्थित राहून आस्वाद घ्यावा असे आवाहन संस्थांच्या वतीने तालमणी डॉ. राम बोरगावकर व सूरमणी पं. बाबुराव बोरगावकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

पान ६ वरून...

### मराठी पत्रकार परिषद प्रिंट व

विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या सूचनेवरून लवकरच अंबाजोगाई शहरात डीजीटल कार्यशाळेचे आयोजन कसे होईल याचा विचार केला जाईल असे ही शेवटी बोलताना म्हणाले.तर अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषदेचे वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी पत्रकार आणि डॉक्टर यांचे कार्य एकच आहे.डॉक्टर जीव वाचवतात तर पत्रकार अन्यायाला वाचा फोडतात. तेव्हा विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात ठिकठिकाणी वैद्यकीय कक्ष प्रमुख म्हणून डॉक्टरांची नेमणूक करणार असून पत्रकारांनी कुठलेही मतभेद न ठेवता कार्य करावे,असे मत व्यक्त केले. या बैठकीचे सुत्रसंचलन पुनमचंद परदेशी,प्रास्ताविक सतिश मोरे तर आभार प्रदर्शन ज्ञानेश मातेकर यांनी केले.या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.यावेळी,मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष मारोती जोगदंड, डिजीटल मिडीयाचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे, उपाध्यक्ष संजय जोगदंड,विरेंद्र गुप्ता,एम.एम.कुलकर्णी,सलीम गवळी,वासुदेव शिंदे,बालाजी खैरमोडे,जोशी,सालेम पठाण, अशोक कोळी,अनिरुद्ध पांचाळ, अमोल माने,सचिन मोरे,संजय रानभरे,अरेफ भाई,योगेश डाके सह मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाचे सदस्य उपस्थित होते.

### ब्रेक के बाद नांदेडमध्ये

होता. प्रारंभी किरकोळ असलेला हा वाद टोकाला जाऊन यातून कमलेश लिंबापुरे उर्फ आशु पाटील याने शेख परवेज व तेजासिंग बावरी यांच्यावर गोळी झाडली. यात शेख परवेज (वय २५) हा जागीच ठार झाला तर त्याच्यासोबत असलेला तेजासिंग बावरी हा जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी घटनास्थळाला भेट दिली असून या गोळीबारात जखमी झालेल्या तेजासिंग बावरी याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

cmyk

# देशात अन्नधान्याचा साठा मुबलक, काळजी करण्याची गरज नाही

## सरकारचं देशवासियांना आश्वासन

भारत पाकिस्तान युद्धाला सुरुवात झाली आहे. पाकिस्तानचे सर्व हल्ले परतून लावण्यात भारतीय सैन्य दलाला यश आलं आहे. भारतावर करण्यात आलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांना जशास तसे प्रत्युत्तर मिळाल्यामुळे पाकिस्तानला चांगलाच झटका बसला आहे. दरम्यान, या युद्धाच्या पार्श्वभूमीवर कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं एक पत्र जारी केलं आहे. आमच्याकडे पुरेशा प्रमाणात तांदूळ, गहू, डाळी, फळे आणि भाज्या उपलब्ध आहेत. देशभरात शेतकऱ्यांकडून पिकांची खरेदी सुरळीत सुरु असल्याचं सांगण्यात आलं आहे. सध्याच्या परिस्थितीत, कोणत्याही नागरिकाने देशाच्या अन्न सुरक्षेची काळजी करण्याची गरज नसल्याचं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे.

पाकिस्तानसोबत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने एक निवेदन जारी केलं आहे. लोकांना अन्न उपलब्धतेबद्दल काळजी करु नये असे आवाहन त्यांनी केलं आहे. देशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेता, आम्ही पूर्णपणे तयार असल्याचे मंत्रालयानं सांगितले आहे. आमच्याकडे पुरेशा प्रमाणात तांदूळ, गहू, डाळी, फळे आणि भाज्या उपलब्ध असल्याचं सरकारनं म्हटलं आहे.

नागरिकांनी देशाच्या अन्न सुरक्षेची काळजी करण्याची गरज नाही



केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्रालयाने शनिवारी देशभरातील नागरिकांना आश्वासन देणारे पत्र जारी केले. मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, सध्याच्या परिस्थितीत कोणत्याही नागरिकाने देशाच्या अन्न सुरक्षेची काळजी करण्याची गरज नाही. धान्ये, डाळी आणि फळे पुरेशा प्रमाणात आहेत. पत्रात, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने म्हटले आहे की आमच्याकडे पुरेशा प्रमाणात भात, गहू, डाळी, फळे आणि भाज्या उपलब्ध आहेत. देशभरात शेतकऱ्यांकडून पिकांची खरेदी सुरळीत सुरु आहे आणि धान्यांपासून ते बागायतीपर्यंत सर्व क्षेत्रात उत्पादन लक्ष्यापेक्षा जास्त आहे. शेतकरी, शास्त्रज्ञ आणि प्रशासन हे तिघेही एकत्र आहेत. तसेच, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आमची तयारी पूर्ण झाल्याचे आश्वासन दिले आहे.

आमच्याकडे पुरेशा प्रमाणात साठा

केंद्रीय अन्न मंत्री प्रल्हाद जोशी यांनी एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, देशात जीवनावश्यक वस्तूंची कमतरता नाही, देशभरात पुरेसा साठा उपलब्ध आहे. मी सर्वांना खात्री देऊ इच्छितो की सध्या आपल्याकडे सामान्य गरजेपेक्षा कितीतरी पट जास्त साठा उपलब्ध आहे. मग ते तांदूळ असो, गहू असो किंवा हरभरा, तूर, मसूर किंवा मूग यासारख्या डाळी असोत. कोणतीही कमतरता नाही आणि नागरिकांना अन्नधान्य खरेदी करण्यासाठी घाबरू नका किंवा बाजारात गर्दी करू नका असा सल्ला देण्यात येत आहे.

साठेबाजी करणाऱ्यांवर कारवाई होणार

आपल्याकडे आवश्यक असलेल्या मानकांपेक्षा खूप जास्त अन्नसाठा आहे. खोट्या संदेशांकडे दुर्लक्ष करा. आवश्यक वस्तूंच्या व्यापारात सहभागी असलेले व्यापारी, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते किंवा व्यावसायिक संस्थांना कायदा अंमलबजावणी संस्थांना सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. साठेबाजी किंवा साठा करण्यात सहभागी असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर आवश्यक वस्तू कायद्याच्या संबंधित कलमांखाली कारवाई केली जाईल अशी माहिती मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली.

## जागतिक दिवस: जागतिक परिचारिका दिन

### महत्वाच्या घटना

१३६४ : पोलंड देशातील सर्वात जुने विद्यापीठ जगीलीनियन विद्यापीठाची सुरवात झाली.
१४५९ : राठोड कुळातील राजपूत प्रमुख राव जोधा यांनी जोधपूर शहराची स्थापना केली.
१५५१ : अमेरिकेतील सर्वात जुने विद्यापीठ सान मार्कोस राष्ट्रीय विद्यापीठाची सुरवात झाली.
१६६६ : आग्रा येथे औरंगजेबाच्या दरबारात शिवाजीमहाराज व औरंगजेब यांची पहिली व शेवटची भेट झली.
१७९७ : नेपोलिअनने व्हेनिस जिंकले.
१९०९ : पुणे येथे अनाथ विद्यार्थी गृहाची स्थापना
१९१५ : भारतीय क्रांतिकारक रासबिहारी बोस यांनी जपानी नौका सानुकी मारू यातून प्रवास करून भारत देश सोडून जपान येथे आश्रय घेतला.
१९४१ : बर्लिनमधील कोनराड झुझ यांनी जगातील पहिले पूर्णतः स्वयंचलित संगणक ३ सादर केले.
१९५२ : प्रजासत्ताक भारताचे पहिले संसदीय अधिवेशन सुरू.
१९५२ : गजसिंग जोधपुरच्या राजेपदी.
१९५५ : दुसरे महायुद्ध संपल्यावर ऑस्ट्रियाने दोस्त राष्ट्रांकडून स्वातंत्र्य मिळवले.
१९६५ : सोव्हिएट अंतराळ स्थानक लूना ५ चंद्रावर कोसळले.
१९८७ : ब्रिटीश रॉयल नेव्ही मधील एचएमएस हार्मिस हि युद्धनौका विकत घेऊन भारताने तीला आयएनएस विराट या नावाने दाखल केले.
१९९८ : केन्द्र सरकारी कर्मचार्यांचे निवृत्तीचे वय ५८ वर्षांवरुन वरुन ६० वर्षे करण्याचा केन्द्र सरकारचा निर्णय.
१९९८ : भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक रामचंद्र नारायण दांडेकर यांना बिर्ला ॲकॅडमी ऑफ आर्ट अँड कल्चर या संस्थेचा जी. डी. बिर्ला आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर.
२००८ : चीनमध्ये ८.० पेक्षा जास्त तीव्रतेच्या भूकंपात ६९,००० पेक्षा जास्त लोक मारले गेले.
२०१० : एस. एच. कपाडीया यांनी भारताचे ३८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२० : फ्लोरेंस नाइटिंगेल, आधुनिक शुश्रुषाशास्त्राच्या संस्थापिका; ब्रिटिश परिचारिका.
१८७५ : भारतीय हिंदू धर्माचे गाढे गाढे अभ्यासक व कलकत्ता विद्यापीठाचे तत्त्वज्ञ कृष्णचंद्र भट्टाचार्य यांचे निधन.
१८९५ : भारतीय तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती यांचा जन्म. (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९८६)
१८९९ : ईंद्रा देवी, भारतीय योगी.
१९०५ : कृतिशील विचारवंत, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज चे संस्थापक आत्माराम रावजी भट यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९८३)
१९०७ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक विजयशंकर जग्नेश्वर तथा विजय भट यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९९३)
१९०७ : हॉलिवूड अभिनेत्री कॅथरिन हेपबर्न यांचा जन्म. (मृत्यू: २९ जून २००३)
१९२६ : भारतीय जनता पक्षाचे माजी कोषाध्यक्ष व राजकारणी तसचं, पश्चिम बंगाल राज्याचे २२ वे राज्यपाल वीरेंन जे. शाह यांचा जन्मदिन.
१९३० : तारा वनारसे, मराठी-इंग्लिश डॉक्टर, लेखिका.
१९३३ : नंदकुमार महादेव नाटेकर उर्फ नंदू नाटेकर, अग्रगण्य भारतीय बॅडमिंटनपटू.
१९४५ : भारताच्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे माजी अध्यक्ष, भारताचे माजी मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश कोनाकुप्पाकटील गोपीनाथन बाळकृष्णन यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय राजकारणी आणि तमिळनाडूचे विद्यमान मुख्यमंत्री करुप्पा गौंडर पलानीस्वामी यांचा जन्मदिन.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू शिख पांडे यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८०९ : ब्रिटिश भारतीय सैन्य दलाचे वरिष्ठ अधिकारी आणि व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता जनरल सर ह्यू हेनरी गफ यांचे निधन.
१९७० : नोबेल पुरस्कार विजेते जर्मन कवी आणि नाटककार नोली सॅच यांचे निधन. (जन्म: १० डिसेंबर १८९१)
१९९३ : भारतीय हिंदी भाषिक कवी शमशेर बहादूर सिंग यांचे निधन.
२०१० : तारा वनारसे, मराठी-इंग्लिश डॉक्टर, लेखिका.
२०१४ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक सरत पुजारी यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९३४)

# हरभऱ्याचे उत्पादन वाढणार

हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन होणारे आणि खाण्यात येणारे डाळवर्गीय पीक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनांपैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७० -७५ टक्के इतका आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनांपैकी ४० -५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरुपात केला जातो.

हरभरा हे रब्बी पीक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेले हरभरा उत्पादनाचे सन २०२२-२३ साठीचे नवीन अंदाज मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन २७.२ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ३६.३९ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. परंतु मागील वर्ष २०२१-२२ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये हरभरा निर्यात वाढलेली आहे तर आयात कमी झालेली आहे.


मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष फेब्रुवारी २०२३-२४ मधील हरभऱ्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी झालेली दिसून येत आहे. फेब्रुवारी २०२४ (१५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत) मध्ये ती ०.५ लाख टन इतकी आहे. जी मागील वर्षी याच कालावधीत २.५ लाख टन इतकी होती. ऑक्टोबर २०२२ पासून हरभऱ्याच्या किंमती वाढत आहेत.

ऑगस्ट २०२३ नंतर त्या सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.

सध्याच्या रब्बी हंगामासाठी हरभऱ्याची सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत रु. ५३३५/क्विंटल एवढी आहे. हरभऱ्याची वाढती निर्यात आणि कमी झालेली आयात ही हरभरा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे.



# रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड; विक्रीतून मिळतो मोठा नफा



शरीरासाठी आरोग्यदायी आणि बाजारात जास्त दरात विकली जाणारी रंगीबेरंगी फुलकोबीच्या लागवडी विषयी माहिती जाणून घेतल्यास चांगला फायदा होऊ शकतो. रंगीबेरंगी फुलकोबीची लागवड पद्धती : रंगीत फुलकोबीच्या लागवडीसाठी ४ ते ५ आठवड्याच्या रोपांची शेतात ६० ६० सें.मी. आणि ६०४५ सें.मी. अंतरावर लागवड करावी. रोपे पुनर्लागवड नंतर पिकाला हलके सिंचन देणे आवश्यक आहे. खत व्यवस्थापन - कुजलेले शेणखत उपलब्ध असल्यास लागवडीच्या १५ दिवस अगोदर १०० क्विंटल शेणखत आणि कंपोस्ट खताची संपूर्ण मात्रा शेतात मिसळावी. ४५ ते ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि १५-१६ किलो पालाश प्रति एकर वापरावे. स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा आणि अर्धी नत्राची मात्रा लागवडीच्या १५ दिवस आधी शेतात टाकून चांगले मिसळावे. नत्राची उर्वरित मात्रा दोन समान भागांमध्ये विभागून पुनर्लागवडीनंतर ३०-३५ आणि ४५ ते ५० दिवसांनी टॉप ड्रेसिंग म्हणून द्यावे. याशिवाय जमिनीत तण काढताना व मशागत करताना ६०० ग्रॅम अमोनियम मॉलिब्डेट आणि ५ किलो बोरॉन प्रति एकर जमिनीतून द्यावे.

सिंचन आणि तण नियंत्रण : पिकाच्या यशस्वी लागवडीसाठी रोपाची लागवड केल्यानंतर गरजेनुसार १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. रंगीत फुलकोबी लागवडीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी करून मातीची भर द्यावी. यानंतर गरजेनुसार खुरपणी करावी.

कीड आणि रोगांचे व्यवस्थापन : रंगीबेरंगी फुलकोबीमध्ये, डायमंड बॅक मॉड आणि मस्टर्ड फ्लाय या मुख्य किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सेंद्रिय औषध बॅसिलस थूरिंगिएन्सिसच्या द्रावणाची फवारणी करावी, असे प्रौढ कीटक पकडण्यासाठी फेरोमोन सापळ्यांचा वापर करावा. रंगीत फुलकोबीमध्ये मर रोगास प्रतिबंध करण्यासाठी ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. शेतात २० ग्रॅम प्रति चौरस मीटर या दराने जमिनीत कंपोस्ट खत मिसळून वापरा. हा रोग आढळल्यास रोपवाटिकेला पाणी देऊ नका. इतर प्रमुख रोगात काळी सड रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोगट झाडे गोळा करून नष्ट करावीत. हा रोग टाळण्यासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड आणि स्ट्रेप्टोसायक्लिन २०० पीएम या द्रावणाची फवारणी करावी.

काढणी आणि उत्पादन : रंगीबेरंगी फुलकोबीचे पीक लागवडीनंतर १०० ते ११० दिवसांनी काढणीसाठी तयार होते. पिकाचे सरासरी एकरी १०० ते १२५ क्विंटल उत्पादन मिळते.एक एकरात फुलकोबीची लागवड केल्यास सुमारे ५० हजार रुपये खर्च येतो. बाजारात ते २५ रुपये किलोने सहज विकले जाते. अशा प्रकारे १०० क्विंटलपासून एकूण उत्पन्न सुमारे अडीच लाख रुपये होईल. निविष्ठा खर्च कमी केल्यास शेतकर्याला २ लाख रूपयांचा निव्वळ नफा मिळेल.

# सानेन जातीची शेळी देते सर्वाधिक दूध

शेतीला जोडधंदा म्हणून बरेच शेतकरी पशुपालन व्यवसाय करतात. पशुपालन व्यवसायामध्ये शेळीपालन हा एक कमी खर्चिक व्यवसाय आहे. शेतकरी वर्गाला शेळीपालन व्यवसाय परवडतो. तसेच व्यावसायिक शेळीपालनातून चांगले उत्पन्न मिळू शकते. परंतु शेळीपालन व्यवसाय यशस्वी होण्यासाठी शेळ्यांच्या उत्तम जातींची निवड करता येणे खूप आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर आज आपण 'शेतकऱ्यांचे एटीएम' समजल्या जाणाऱ्या सानेन शेळीबद्दल अधिक माहिती जाणून घेणार आहोत. सानेन जातींच्या शेळ्यांचे मुळस्थान स्वित्झर्लंड आहे. आता युरोप, अमेरिकेपासून अफगाणिस्तानात ही शेतकरी या शेळ्या मोठ्या प्रमाणात पाळत आहेत. सानेन जातीच्या शेळीचा गाबन काळ फक्त पाच महिन्यांचा असतो. त्यामुळे पाच ते सहा वेते सहज मिळू शकतात. या जातीच्या शेळीपासून एका वेतात कधी दोन तर कधी तीन करडे मिळतात. तीन वेतात पाच करडे मिळू शकतात. इतर गावठी शेळ्यांच्या तुलनेत गाभण राहण्याचे या जातीचे प्रमाण अधिक आहे.



वातावरणाशी घेते जुळवून : सानेन शेळी त्यांच्या आकर्षक पांढर्या रंगासाठी आणि विविध हवामानाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जाते. ज्यामुळे सानेन शेळी जगभरातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक लोकप्रिय पर्याय होत आहे. सानेन जातीची शेळीमध्ये दिवसाला पाच ते बारा लिटर दूध देण्याची क्षमता आहे. ज्यात फॅटचे प्रमाण सुमारे ३-४ टक्के असते. ज्यामुळे ही शेळी उच्च-गुणवत्तेत दुधाची विश्वसनीय शेळी झाली आहे.

सानेन जातींच्या शेळ्यांची वैशिष्ट्ये : या जातीच्या शेळ्या कोणत्याही प्रकारच्या हवामानात सहज तग धरू शकतात. ज्वारीचा कडबा, मका, अशा पारंपरिक चाऱ्यावर देखील या शेळ्यांचे पालन करता येते. सर्व प्रकारच्या खाद्याचे, गवताचे आणि अपारंपरिक खाद्याचे दूध, मांस आणि कातडी मध्ये रूपांतर उत्तम पद्धतीने करतात. या शेळ्यांची रोग प्रतिकार शक्ती चांगली असून विविध आजरांस लवकर बळीपडत नाही. शेळ्या दुरवर रानात, डोंगर कपाऱ्यात करण्यास जाऊ शकतात. तसेच कमीत कमी भांडवली गुंतवणूक व्यवस्थापन करणे सहज शक्य असते. कोणत्याही वातावरणाशी समरस होण्याची नैसर्गिक क्षमता असल्यामुळे कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या निवाऱ्याची गरज नसते.

# अखेर पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या पाटोदा तालुक्यातील बेडुकवाडी येथील शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल

## पोलिस प्रशासनाच्या मदतीने पवनचक्की कंपन्यांची रझाकारी सुरु - डॉ.गणेश ढवळे

पाटोदा । प्रतिनिधी

जिल्हा आणि पोलिस प्रशासन पवन आणि सौर ऊर्जा कंपनीच्यांचे हस्तक झालेले असुन कंपन्यांना शेत जमीनीचा ताबा देण्यासाठी पोलिस प्रशासन अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन मावेजा मागणा-या शेतकऱ्यांनाच पोलिसी ''खाक्या'' दाखवत असुन खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचे प्रकार पाटोदा तालुक्यात आढळून येत असतानाच पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकरी शिवाजी बाजीराव शिंदे, बालाजी शिवाजी शिंदे आणि जेसीबी आपरेटर या तिघांवर ओटु पवनचक्की कंपनीचे कर्मचारी मोहन रामा गाडे यांच्या तक्रारीवरुन भादंवि ११५(२) ,१२६(२),३०८(२), आणि ३०८(३)(५) कामाला विरोध करणे, जाणिवपूर्वक हत्येचा प्रयत्न करणे आदी कलमांतर्गत दाखल करण्यात आल्याचा दुर्दैवी प्रकार घडला आहे.





जर जिल्हा आणि पोलिस प्रशासन शेतकऱ्यांवरच अन्याय करत असेल तर शेतकऱ्यांनी मावेजा मागण्यासाठी कोणाच्या दारात जायचे. पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांना प्रत्यक्ष भेटून जनता दरबारात आपली व्यथा मांडली परंतु त्यांना न्याय देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी असमर्थता दाखवली.

त्यामुळे जे जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या जमिनी कंपन्यांच्या ताब्यात देण्यासाठी अमर्याद अधिकार वापरते ते प्रशासन शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाची आस्थेवाईकपणे चौकशी करत नाही आणि लोकप्रतिनिधी याबद्दल चकार शब्द काढत नाहीत हि शोकांतिका असल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे. आम्हाला न विचारताच आमच्या शेतजमिनीत तारा ओढण्यास विरोध केला म्हणून आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केले. शिवाजी शिंदे व बालाजी शिंदे ( बेडुकवाडी ता.पाटोदा) पाटोदा तालुक्यातील दासखेड ग्रूप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील शेतकरी शिवाजी बाजीराव शिंदे आणि त्यांचा मुलगा बालाजी शिंदे यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संवाद साधताना काल दि.१० शनिवार रोजी सायंकाळी आमच्या शेतातुन उच्च दाबाची विद्युत तार ओढणा-या ओटु कंपनीच्या कर्मचाऱ्यांना विरोध केला असता. सायंकाळी ७ वाजता गावातील काही जण व कंपनीचे कर्मचारी आणि १ बंदुकधारी पोलिस असे ३०-४० लोक आले आणि त्यांनी आम्हाला धक्काबुक्की करत तुम्हाला काय विचारायचे?? मावेजा वगैरे काही मिळणार नाही म्हणून खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली.

यावेळी उपस्थित बंदुकधारी पोलिस यांनी काहिही न करता फक्त बघत बसले.आम्ही पाणाड्याकडुन याठिकाणी बोर व विहिरीसाठी जागा बघितलेली असुन येथून विद्युत तार गेल्यावर विहिर कशी खोदणार असा प्रश्न उपस्थित केला. शिवाजी शिंदे यांचा मुलगा बालाजी शिंदे यांना पाटोदा पोलिस स्टेशनचे बीट अंमलदार यांनी फोन करून तुमच्यावर गुन्हे दाखल करण्यात आला असल्याचे सांगितले.तुम्ही कशाला विरोधात जाता म्हणून आमची बाजु ऐकुन न घेताच आम्हालाच विरोध न करण्याचा सल्ला दिल्याचे म्हटले आहे. पवनचक्की कंपन्यांना विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना दमदाटी, धमकावणे, त्यांना न विचारताच त्यांच्या शेतात काम करणे,मावेजा न देणे, विविध शेतकऱ्यांना वेगवेगळे मावेजा देणे, धनादेश न वटणे असे सर्रास प्रकार घडत असताना आता शेतकऱ्यांवर पोलिस प्रशासनाच्या मदतीने गुन्हे दाखल करणे दुर्दैवी आहे. लोकप्रतिनिधी ऐरवी शेतकऱ्यांचे आम्हीच कैवारी म्हणून गळा काढतात.सध्या शेतकरी या पवनचक्की कंपन्यांकडून नागवला जात आहे. जिल्हा व पोलीस प्रशासनाला हाताशी धरून कंपन्या शेतकऱ्यांच्या जमिनी घशात घालत आहेत.मात्र लोकप्रतिनिधी याबाबत जिल्हा प्रशासन अथवा पवनचक्की कंपन्यांना साधा जाब विचारायला तयार नाहीत.याची किंमत लोकप्रतिनिधींना निवडणुकीत मतदानाच्या वेळी चुकवावी लागणार असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे. जिल्हा व पोलीस प्रशासन कंपन्यांच्या हातचे बाहुले झाल्याने त्यांच्या कडुन न्यायाची अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही.

---

# परळी व अंबाजोगाई परिसरात दहशत माजवणाऱ्या टोळीवर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई

### मुख्य आरोपीसह पाच अटकेत

बीड । प्रतिनिधी

परळी व अंबाजोगाई भागात दहशत निर्माण करून संघटीत गुन्हे करणाऱ्या रघुनाथ फड टोळीवर बीड पोलिसांनी मोठी कारवाई करत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या नेतृत्वाखाली व तपासी अधिकारी पोनि रघुनाथ नाचण यांच्या प्रयत्नातून ही कारवाई झाली आहे.

दिनांक ०१ मार्च २०२५ रोजी न्यायालयाच्या आदेशानुसार परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्यात फिर्यादी सहदेव सातभाई यांच्यावर १८ ऑक्टोबर २०२३ रोजी २.७० लाख रुपये घेऊन जात असताना टोळीने प्राणघातक हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले होते व रक्कम लुटली होती. या प्रकरणात रघुनाथ फडसह ७ ते ८ जणांनी मिळून गुन्हा केला होता.

या प्रकरणातील मुख्य आरोपी रघुनाथ फड यास ०७ मार्च २०२५ रोजी अटक करण्यात आली. तसेच जगन्नाथ फड, सुदीप सोनवणे, बालाजी दहीफळे आणि विलास गीते यांना २८ मार्च रोजी अटक करण्यात आली.

यापैकी दोन आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. तपासादरम्यान या टोळीने परळी, अंबाजोगाई आणि संभाजीनगर हद्दीत एकूण १० गंभीर गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. या सर्व प्रकरणांमध्ये गुन्हेगारीची सातत्यपूर्णता व संघटित स्वरूप पाहून, तपासी अधिकाऱ्यांनी मोक्का कायद्यांतर्गत प्रस्ताव तयार करून पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्याकडे सादर केला होता. त्यांनी तो मा. विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राकडे पाठवला. दिनांक ०७ मे २०२५ रोजी मोक्कांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मंजुरी देण्यात आली.

पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले करत आहेत. या कारवाईत पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण, सपोनि योगेश शिंदे, पंडीत पांचाळ, धनश्री भताने, किशोर घटमळ व स्थागुशा बीडचे पथक सहभागी होते. बीड पोलिसांकडून भविष्यातही गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्यांवर मोक्का व एम.पी.डी.ए. अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.

---

# राज रायते यांचा तेली समाजाच्या वतीने राज्यस्तरीय सत्कार

बीड । प्रतिनिधी

श्री संताजी नवयुवक मंडळ, महाराष्ट्र राज्य द्वारा आयोजित श्री संत गजानन नगरी, शेगाव येथे प्रथम राज्यस्तरीय अधिवेशन, तेली समाजाचे आमदार तसेच इतर मान्यवरांचा भव्य सन्मान सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.. या सन्मान सोहळ्यात श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित असलेल्या गीतांचे उत्कृष्ट असे सुप्रसिद्ध गायक राज प्रल्हाद रायते यांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित आला आहे. .या कार्यक्रमात सर्व समाज बांधव आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत, तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष,तथा अखिल भारतीय तैलिक साहु मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षिरसागर यांचा कायम भक्कम पाठिंबा व आशिर्वाद राज रायते यांच्या पाठीशी आहे..

राज रायते यांना या कार्यक्रमाचे आमंत्रण स्वतः नागपूर वरून बीड ला येऊन श्री संताजी नवयुवक मंडळ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मा. सुभाषजी घाटे यांनी दीले आहे.



आपल्या कला गुणांनी परिपूर्ण असलेल्या राज चा समस्त तेली समाजाच्या वतीने भरपूर ठिकाणी मोठमोठ्या प्रमाणात सत्कार होत आहे राज रायते यांना सर्व समाज बांधवां ची साथ असुन, त्यांची आई सौ.सोनाली रायते व वडील श्री. प्रल्हाद चंद्रकांत रायते यांचीही खंबीर साथ आहे. आता पर्यंतच्या मेहनती मध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. समाजात एक वेगळी ओळख निर्माण करून संपूर्ण तेली समाजात रायते कुटुंबाचे नावलौकीक केले आहे.. राज यांचे पंजोबा, कै.संत आसारामजी वैजनाथराव रायते तसेच आजोबा कै. चंद्रकांता आसारामजी रायते यांची पुण्याई आहे. समाजाच्या वतीने शेगांव येथे होणाऱ्या भव्य राज्यस्तरीय सत्कार समारंभात बीड जिल्ह्यातील गायक राज प्रल्हाद रायते यांचा होणाऱ्या सन्मान सोहळ्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे राज ला फोन द्वारे, मेसेज द्वारे व सर्व सोशल मीडिया द्वारे शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.. ११ मे रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत हा कार्यक्रम अग्रेसन भवन , रेल्वे स्टेशन समोर, शेगांव, जिल्हा बुलढाणा येथे आहे. सर्व समाज बांधवांनी व मित्र परिवारांनी या सत्कार सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती करण्यात आली आहे.

---

# संस्कार आणि शिस्त हेच जीवनाचे सूत्र-डॉ.कराळे

केज/प्रतिनिधी

मानवी जीवन हे अनेक प्रश्न, उत्तरे आणि अनुभव यातून भरलेले आहे. यात सुख दुःख, संकटे आणि संघर्ष अटळ असून अनपेक्षित आणि आपत्कालीन घडणाऱ्या घटनाही आहेत. यावर मात करण्यासाठी बी.एड अध्यापनात झालेले संस्कार व शिस्त हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. नागेश कराळे यांनी केले. ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज येथे बी एड्? द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर हे होते. त्यावेळी प्रा. जयश्री कचरे, प्रा. उषा बलाढ्ये व श्री सुजित नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. सौदागर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जीवनातील बी एड्चे वर्षे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जीवनाची दिशा ठरवणारे असून आपल्याला कर्तव्याची जाणीव करून देणारे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास कांबळे यांनी तर आभार पूजा भोसले यांनी मानले. यावेळी बीएड अध्यापक छात्र हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# पाटोद्यात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भव्य तिरंगा रॅली

पाटोदा । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस यंदा थाटामाटात न साजरा करता, भारताच्या एकतेचा संदेश देण्यासाठी व देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या वीर जवानांच्या सन्मानार्थ पाटोदा येथे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.ही रॅली दिनांक ११ मे २०२५ रोजी पाटोद्याच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समाप्त झाली.




यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते, पदाधिकारी, युवक,आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.हातात तिरंगा आणि मुखात देशभक्तिपर घोषणा ''भारत माता की जय'', ''जय जवान, जय किसान,''जय संविधान'', '' अशा घोषणांनी वातावरण देशभक्तीने भारून गेले होते. रॅलीदरम्यान संविधानाची प्रस्तावना वाचून देशाच्या एकतेची वचनबद्धता व्यक्त करण्यात आली.या वेळी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की,''बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस केवळ एक साजरा करण्याचा दिवस नसून, तो सामाजिक संदेश देण्याचा आणि जनतेला संविधानप्रेम व देशप्रेम जागवण्याचा दिवस आहे. यंदाचा वाढदिवस सीमेवरील जवानांना समर्पित करून आम्ही देशप्रेमाचे उदाहरण समाजापुढे ठेवले आहे.''ही रॅली शांततेत, शिस्तबद्धपणे पार पडली असून, पाटोद्याच्या जनतेतून वंचित बहुजन आघाडीच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---

# आर्वीत अखंड हरिनाम सप्ताह, मिरवणुकीसह पुष्पवृष्टीने प्रारंभ

शिरूर । प्रतिनिधी

स्वामी जनार्दन महाराज यांच्या प्रेरणेने आर्वी येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली आहे. स्वामी निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने सुरू झालेला हा सप्ताह यंदा तिसऱ्या वर्षात प्रवेशला. मिरवणूक, वीणापूजन आणि पुष्पवृष्टी सोहळ्याने सप्ताहाचा प्रारंभ झाला. १९ मे रोजी सप्ताहाची सांगता होणार आहे. श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाच्या अधिपत्याखाली २०२३ मध्ये सप्ताहाची सुरुवात झाली. यंदाही जय्यत तयारी करण्यात आली आहे. रखरखत्या उन्हातही ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुष्पवृष्टी सोहळ्यावेळी स्वामी जनार्दन महाराज प्रमुख पाहुणे होते. सोहळ्यादरम्यान पावसाच्या सरी आल्या. ब्रह्मवंदाच्या मंत्रोच्चारात पुष्पवृष्टी पार पडली.



सप्ताहात नामवंत कीर्तनकार कीर्तनसेवा करणार आहेत. महंत उद्धव महाराज शास्त्री, महंत माउली महाराज पठाडे, महंत अविनाश भारती, महंत रामेश्वर महाराज शास्त्री, महंत शिवाजी महाराज, महंत ज्ञानेश्वर महाराज कोठुळे, महंत माऊली महाराज खडकवाडीकर यांचे कीर्तन होणार आहे. सांगता स्वामी जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल. महंत सिद्धेश्वर महाराज गाडे दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत रामायण कथा सांगणार आहेत. काकडा, भजन, हरिजागर यासह सात दिवस अखंड कार्यक्रम होणार आहेत. भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

# विडा तलावांचे खोलीकरण केल्यामुळे गांवकरी यांनी मानले आभार

## कामेश वाघमारे व सदाशिव वाघमारे यांच्या पुढाकारातून झाले तलावाचे खोलीकरण

केज । प्रतिनिधी

अँक्शन फॉर टेक्नॉलॉजी यवतमाळ संस्थेच्या वतीने विडा तलावांचे खोलीकरण केल्या मुळे गांवकरी यांनी आभार मानले तर कामेश वाघमारे व सदाशिव वाघमारे यांच्या पुढाकारातून तलावाचे खोलीकरण झाल्यामुळे ग्रामस्थांनी त्यांचेही कौतुक केले.केज तालुक्यातील विडा गावामधे सार्वजनिक गायराना जवळील जून्या तलावांचे पुनरुज्जीवन करुन १२०० लांबीचे अँक्शन फॉर टेक्नॉलॉजी यवतमाळ या संस्थेच्या माध्यमातून गाळ उपसा केल्याने सर्व सामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



केज तालुक्यातील विडा येथे तलावाचे खोलीकरण अंदाजे खोलीकरण १० फुट व रुंदीकरण १०० फुट व लांबी साधारण दोन्ही बाजूंनी १२०० फुट लांबी करुन तलावातील गाळ उपसा केला,आणि त्यामधे मोठ्या प्रमाणामधे पाण्याचा जास्तीत जास्त साठा कसा होईल व संपूर्ण गावाला, दलितवस्ती, बौद्धनगर, साठेनगर,झोपडपट्टी घोरपडेवस्ती, कोरडेवाडी रोड या सर्व ठिकाणी कस पाणी मुबलक घरोघरी मिळेल यासाठी प्रयत्न करून अंदाजे २ हजार नागरिकांना या तलावाचे पाणी वापरता यावे यासाठी कामेश वाघमारे व सदाशिव (आबा) वाघमारे ( उप सरपंच विडा ) या दोघांनी अक्शन फॉर रूलर टेक्नोलोजी संस्था यवतमाळ एआरटी यांचे कडू पाटपुरावा करून तलावाची पाणी पातळी कशी वाढेल याचे नियोजन करुन पाणी कस वाढेल हे सर्व गोष्टी लक्षात घेऊन प्रयत्न करून काम कायम स्वरूपी पिड्यानुपिढ़्या काम होणार नाही असे काम करुण घेतले आहे त्याबदल संस्थांचे आभार गावकरी यांच्या वतिने मानले. तर कामेश वाघमारे व सदाशिव वाघमारे यांनी गावातील नागरिकांना उन्हाळ्यामध्ये देखील भरपूर प्रमाणात पाणी मिळावे यासाठी प्रयत्न केल्याबद्दल गावकऱ्यांनी या दोघांचीही कौतुक केले.

---

# मटका जुगार खेळणाऱ्यांवर छापा; ८७३० रूपयांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड पोलिसांनी कडबा मंडी परिसरात कल्याण मटका नावाचा जुगार खेळणाऱ्या इसमांवर कारवाई करत एकूण ८,७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध जुगार अड्ड्यांना चांगलाच दणका बसला आहे. पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज यांना मिळालेल्या माहितीवरून त्यांनी पोह. नसीर शेख, पोअं. अल्ताफ शेख, कलीम इनामदार आणि चालक पोह. असद शेख यांच्या मदतीने कडबा मंडी येथे छापा टाकला. या कारवाईत खालील इसम सापडले.गु.र.नं. १३९/२०२५ अंतर्गत शेख मुजीद शेख गणी (रा. नागोबो गल्ली) आणि विनोद काशिनाथ लोळगे यांच्याकडून रु. २,९५०/- रोख रक्कम व रु. २,०००/- किंमतीचा मोबाईल असा एकूण ४,९५०/- चा मुद्देमाल जप्त केला तर गु.र.नं. १४०/२०२५ अंतर्गत दत्ता आश्रुबा डोईफोडे, अंगद तुकाराम माने, दीपक बबन ढोणे आणि रमेश साहेबराव ढोणे यांच्याकडून रु. २,७८०/- जप्त केला आहे .एकूण मिळून ८,७३०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही संपूर्ण कारवाई मा. पोलीस अधीक्षक नवनीत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन, व उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली आहे .पेठ बीड पोलीस ठाण्याच्या पथकाने केलेली ही कारवाई स्थानिक गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे.

# शासकीय जमिनीची बोगस दानपत्र तयार करुन विक्री

## न.प.च्या चार कर्मचाऱ्यांसह खाजगी व्यक्ती विरोधात माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शहरातील सर्वे नंबर ६ मध्ये असलेली ओपन पेस शासकीय जमीन बोगस कागदपत्र तयार करून व नगरपालिका कर्मचा-यांना हाताशी धरून विक्री केल्याप्रकरणी नगरपालिकेचे तात्कालीन कार्यालयीन अधीक्षकासह नगरपालिकेचे तीन कर्मचारी व खोटे दस्तावेज तयार करणाऱ्या अस्लम बेग मिर्झा याच्या विरोधात माजलगाव शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

शहरातील मनुर रोड लगत असलेली सर्वे नंबर ६ मधील जमिनीस १६ सप्टेंबर २०२४ रोजी ४ हजार स्केअर फुट जागेस ले आउटला




मान्यता देण्यात आली.तसेच या जमिनीतील ४०८ स्केअर फुट जागा ही ओपन पेस म्हणून ठेवण्यात आली होती. सदरची जमीन ही प्रकाश जोशी यांच्या नावे होती. सदरील ओपन पेस जागेवर आस्लम बेग मंजूर बेग मिर्झा याने येथील नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक गणेश पुंडलिक डोंगरे, नामांतर प्रमुख फुलचंद कटारे,पी टी आर प्रमुख सुधाकर रामभाऊ उजगरे,कर निरीक्षक वाजेद आली आबेद अली यांना हाताशी धरून शंभर रुपयाच्या बॉण्डपेपरवर मूळ मालकाचे दानपत्र व खोटे कागदपत्र तयार करून नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांशी हाताशी धरून बनावट आदेश, पीटीआर व गावठाण प्रमाणपत्र तयार करुन शासनाची दिशाभूल करून शासकीय जागा हडपण्याचा प्रयत्न केला.याप्रकरणी नगरपालिकेचे सहाय्यक नगरचनाकार आकाश गुलाब राठोड यांच्या तक्रारीवरून आस्लम बेग मंजूर बेग मिर्झा,गणेश पुंडलिक डोंगरे, फुलचंद कटारे, सुधाकर रामभाऊ उजगरे, वाजेद अली आबेद अली यांच्यावर माजलगाव शहर पोलिसात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अस्लम बेग मंजूर बेग मिर्झा यास पोलिसांनी अटक केली असून चार आरोपी फरार झाले आहेत.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सूर्यताळ,पोलीस उपनिरीक्षक आकाश माकणे हे करत आहेत.

# मस्साजोग येथील नदी खोलीकरण कामाची ॲड. अजित देशमुख यांनी केली पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

**नाम फाउंडेशन मार्फत मस्साजोग येथील नदी खोलीकरणाचे काम चालू आहे. या कामाची पाहणी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी आज केली. काम चांगल्या पद्धतीने चालू असून नदीची खोली आणि रुंदी देखील चांगली असल्याने देशमुख यांनी यावेळी समाधान व्यक्त केले.**



नाम फाउंडेशन मार्फत नदी खोलीकरणासाठी ॲड. अजित देशमुख यांनी मशीन उपलब्ध करून दिल्यानंतर जवळपास तीन किलोमीटर परिसरातील नदीचे खोलीकरण होत आहे. या कामाने वेग घेतला असून यातून मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये देखील उत्साहाची वातावरण आहे. नदी परिसरात फिरताना आज धनंजय देशमुख, भागवत कदम, तुषार देशमुख, सुदर्शन देशमुख, मनोज देशमुख यांच्यासह शेतकरी देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कामाची गती आणखी वाढवून कामाचे प्रमाण देखील वाढवावे, असे यावेळी देशमुख यांनी म्हटले. या नदीपात्रात असलेले बंधारे आता मोठ्या प्रमाणात पाणी साठवून ठेवणार असल्यामुळे पावसाळ्यात शेतकऱ्यांच्या मनातील आनंद वृद्धिंगत होणार आहे. यातून पिकत नसलेली शेती आता पिकणार असल्यामुळे शेतकरी देखील समाधान व्यक्त करत होते.

# घरकुल ऑनलाईन सर्व्हेसाठी मुदतवाढ द्या -सचिन शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामविकास अधिका-यांच्या मार्फत-किंवा स्वतःच्या माध्यमातून सर्वे करण्याचे काम सुरू असून बीड जिल्ह्यातील अनेक गावामध्ये सध्या शासनाकडुन प्रत्येकाला हक्काचे घर मिळणार आहे.तसे शासनाकडुन लाभार्थ्यांना सेल्फ सर्व्हे करण्यास शासनाने अप उपलब्ध करुन दिले आहे.परंतू लाभार्थी हे सेल्फ सर्व्हे करतांना सदरील अप मध्ये माहिती साठविताना दिरंगाई होत आहे.हा सर्वे करताना अनेक अडथळे निर्माण होत आहे. त्यामुळे सेल्फ सर्व्हे जिकीरीचे जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लाभार्थी नागरिक हताश होत आहेत. या सर्वेची अंतिम तारीख १५ मे पर्यंत दिली आहे,परंतू अद्याप पर्यंत अनेक लाभार्थी नागरिकांचे ऑनलाईन सेल्फ सर्वे झालेला नाही.ह्या सर्वे पासून अनेक नागरिक वंचित राहतील तरी शासनाने या सर्वेला मुदतवाढ द. आहे. सचिन शिंदे उपसरपंच नेकनूर. यांना संपर्क साधा ९७३०५३४१५२.

सुजित शिंदे.९६२३८२८३३३

नेकनूर प्रतिनिधी शेख शाकेर. ९७६७८५००८४

दिनू काळे ग्रामपंचायत कर्मचारी.८८८८०८००१०

या.नंबर वर संपर्क साधा. असावा. आव्हान सचिन शिंदे. उपसरपंच ने केले आहे.

# बुद्ध विहारात धम्माचे संस्कार करून आदर्श समाज निर्माण करा: पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो

**बीड । प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मातरांची घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपुर मुक्कामी तथागत बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागतांचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सम्यक सम्बुद्ध जयंती औचित्य साधून रविवार रोजी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो, पुज्य भिक्खु डॉ.इंदवंन्स महाथेरो, पुज्य भिक्खु चंद्रमुणी, पुज्य भिक्खु धम्मघोष, पुज्य भिक्खु पय्यावर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून भिमराजनगर राजुरीवेसपर्यंत बुद्ध मूर्तीची भव्य मिरवणूक काढून भीमराज नगर येथील विहारात बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली.पूज्य भिक्खु यांच्या वतीने उपासक-उपासिका यांना धम्मदेसना देण्यात आली.**



### भव्य रॅली काढून भिमराज नगर येथे बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा

बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापणा प्रसंगी कार्यक्रमाचे आयोजक, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, प्रा.प्रदीप रोडे, अमरसिंह ढाका,ॲड भगवान कांडेकर, गौतम चोपडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापना प्रसंगी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले की, डॉ.आंबेडकरांनी समाज बांधवाना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, सामाजिक शैक्षणिक, आर्थिक, व राजकीय प्रगतीसाठी क्रांती केली. बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्म क्रांती केली व दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागताचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्याची जबाबदारी सर्व आंबेडकरी अनुयायाची आहे. बुद्धांचे तत्वज्ञान आत्मसात करून तथागताच्या धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी दर रविवारी उपासक-उपासिका यांनी बुद्ध विहारात बुद्ध वंदना घेऊन बुद्ध धम्माचे अनुकरण करणे सर्वांची जबाबदारी आहे. शांतीने जगण्यासाठी बुद्धाच्या तत्वज्ञानाशिवाय पर्याय नाही. कारण जगाला युद्धाची नाहीतर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची गरज आहे. यावेळी राजू जोगदंड, रमेश गंगाधरे, किसन तांगडे, ॲड.सुरेश वडमारे, डी. जी. वानखेडे, अरुणराव कागदे, विष्णु वाघमारे, रणजित क्षीरसागर, प्रशांत वासनिक, ॲड. तेजस वडमारे, प्रा. राम गायकवाड, बापू पवार, रमेशराव सोनवणे, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, मिराताई कागदे, गयाबाई उजगरे, अलकाताई कांडेकर, अरुणाताई आठवले, संगीता वडमारे, ज्योतीताई वीर, उषाताई सोनवणे, कलावती गंगाधरे, शोभा जोगदंड, गवळण वडमारे, महेश आठवले, दयानंद उजगरे, नाना मस्के, विलास जोगदंड, भारत कांबळे, सुभाष तांगडे, भैय्यासाहेब मस्के, भैय्यासाहेब साळवे, अक्षय कोकाटे, शाम वीर, महेंद्र वडमारे, प्रभाकर चांदणे, महेंद्र कांबळे, मनोज बोराडे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, संजय हनवते, सोनू वडमारे, प्रभाकर जोगदंड, दिपक ओव्हाळ, बाळु कांडेकर, गौरी वडमारे, पप्पू साळवे, कपिल साळवे, नामदेव वाघमारे,संजय कागदे, अजिंक्य वडमारे, चिंटू वडमारे, समाधान जाधव यांच्यासह या कार्यक्रमास सामाजिक, राजकिय क्षेत्रातील मान्यवर तसेच उपासक-उपासिका उपस्थित होते.

# मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सदस्यांनी एकत्र येवून कार्य करावे -जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके

अंबाजोगाई (प्रतिनिधी)- पुढील काळ सर्व पत्रकारांसाठी आव्हानात्मक असून अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सर्व सदस्यांनी एकत्र येवून कार्य करावे,असे मत मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी व्यक्त केले.

आज दुपारी अंबाजोगाई शहरातील बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कक्षात मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशावरून मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाची बैठक संपन्न झाली.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हाकार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर हे होते तर प्रमुख पाहुणे



म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवि उबाळे हे उपस्थित होते.तर व्यासपीठावर जिल्हा समन्वयक दत्तात्रय अंबेकर व अंबाजोगाई पत्रकार वैद्यकीय कक्ष प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष विशाल सांळुके म्हणाले की,बीड जिल्हयात अंबाजोगाई शहराचे नाव लौकिक आहे.मराठी पत्रकार परिषदेचे सर्वात जास्त कार्यक्रम हे अंबाजोगाईत होतात.मराठी पत्रकार परिषदेच्या सदस्यामुळेच संघटनेची ओळख असते.अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीया हे एकाच छताखाली कार्य करतात.विश्वस्त एस.एम.देशमुख यांचे कार्य महाराष्ट्रात सर्वदूर आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या सदस्याच्या सुखदुःखात सदैव साथ देणारी ही पत्रकार संघटना आहे. या बैठकीत शेवगाव येथे होणारया आगामी अधिवेशना बाबतही चर्चा करण्यात आली

तसेच मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अंबाजोगाई येथे डीजीटल कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल.आधुनिक तंत्रज्ञान आणि डीजीटल बातम्यातील बारकावे आदीची माहिती डीजीटल मिडीयाच्या पत्रकारांना ज्ञात व्हावे या करिता लवकरच कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल अशी माहितीही सांळुके यांनी दिली. तर विभागीय सचिव रवि उबाळे यांनी ही आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, बीड जिल्ह्यातील मराठी पत्रकार परिषद प्रिंट व डिजीटल मिडीयाच्या सर्व सदस्य हे संघाचे अंगभूत नेतृत्व करणारे सदस्य आहेत.विशेष करून अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषदेचे सर्व सदस्यांचे कार्य उल्लेखनीय असून ◀◀ पान ३ वर

### पत्रकार कन्या अक्षता सुर्यवंशी हिचा सत्कार

आज झालेल्या बैठकीत बर्दापूर येथील पत्रकार गोविंद सुर्यवंशी यांची कन्या कु.अक्षता सुर्यवंशी यांची महापारेषण विभागात विद्युत सहय्यक पदी निवड झाल्याबद्दल उपस्थित मान्यवर पत्रकार विशाल साळुंके,रवि उबाळे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

# ब्रेक के बाद नांदेडमध्ये गोळीबार एक ठार ; एक जखमी



नांदेड । प्रतिनिधी

नांदेड शहर व परिसरात गुन्हेगारांनी पुन्हा डोके वर काढले यातून तीन जणांमध्ये वाद होऊन एकाने दुसयावर गोळीबार केला. यात एक जण ठार झाला तर अन्य एक गंभीर जखमी झाला. वसरणी येथील जलशुद्धीकरण केंद्राजवळ रविवारी सकाळी ११ वा. ही घटना घडली. त्यामुळे 'ब्रेक के बाद' नांदेडमध्ये गोळीबाराचा अनुभव नांदेडकरांना आला.

दोन महिन्यापूर्वीच शहरातील गुरुद्वारा परिसरात घडलेल्या गोळीबाराची चर्चा थंडावत असताना आज दि.११ मे रोजी सकाळी पुन्हा एकदा गोळीबाराने नांदेड शहर हादरले. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला आशु पाटील उर्फ कमलेश लिंबापुरे याच्यासह शेख परवेज, तेजासिंग बावरी या तिघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद सुरू ◀◀ पान ३ वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर डोक्यावर नाही तर बाबासाहेबांचे विचार डोक्यात घेतले पाहिजे -शेख

## खिळद येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील खिळद येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त व तथागत गौतम बुद्ध सार्वजनिक जयंतीनिमित्त दि.०८/०५/२०२५ रोजी भिमज्योत मित्र मंडळ यांच्या वतीने गावात ,जंगी मिरवणूक कार्यक्रम आयोजित केला. , त्यावेळी कार्यक्रमाला . यशवंत खंडागळे, अशोक साळवे, सरपंच श्रीराम गर्जे,भरत जाधव, पत्रकार संजय खंडागळे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, दीपक बोराडे, पत्रकार संदीप जाधव,विकास साबळे,भाऊ खेत्रे,नवनाथ सातपुते, हरी गोरे,



पत्रकार दादा पवळ,सुनील साखरे, विजय साखरे, तुषार साखरे, सुशांत साखरे, अजय साखरे, प्रबोधन साखरे, शरद सपुत्रे, भैय्या सपुत्रे, प्रथम साळवे,सोपान साखरे , संदीप आंधळे, जय आंधळे तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ व बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.. व दि.०८/०५/१०२५ रोजी भव्य दिव्य मिरवणुकीचे आयोजन केले होते, व भीमनगर खिळद येथे जेवणाचे आयोजन केले होते, यावेळी माता भगिनी, व पंचक्रोशीतील भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले तर भीमज्योत मित्र मंडळ यांच्यावतीने सुनील साखरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# संत बंकटस्वामी महाराज यांच्या काकडा भजनात प्रत्यक्ष पांडुरंग ऐकायला यायचा -समाधान महाराज शर्मा

**बीड । प्रतिनिधी**

संत बंकटस्वामींचे काकडा भजन पांडुरंगाला आवडायचे त्यामुळे प्रत्यक्ष पंढरीश पांडुरंग ऐकायला यायचा.देवाला आवडणारे भाजप बंकटस्वामीचे होते असे प्रतिपादन श्री ह भ प समाधान महाराज शर्मा यांनी केले.संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प राम महाराज डोंगर, श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश म जाधव यांच्यासह हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे वारकरी संप्रदायातील महान संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात पाचव्या



दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प समाधान महाराज शर्मा यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या

श्रीगुरुसारिखा असतां पाठीराखा ।
इतरांचा लेखा कोण करी ।।१।।
राजयाची कांता काय भीक मागे ।
मनाचिया जोगे सिध्दि पावे ।।२।।
कल्पतरुतळवटीं जो कोणी बैसला ।
काय वाणी त्याला सांगिजोजी ।।३।।
ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों ।
आतां उध्दरलों गुरुकृपें ।।४।।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की भजन आणि भोजन या शब्दा मध्ये काना आणि मात्रेचा फरक आहे..पण भोजन मात्रेत असावे. भजन अमर्याद असावे असा भाव महाराजांनी सांगितला.आयुष्य मध्ये गुरू लागतो.गुरूशिवाय तरणोपाय नाही. आत्मउद्धार करण्यासाठी प्रत्येकाला संत बंकटस्वामी महाराज यांच्यासारखे श्रीगुरू पाठीशी असले पाहिजे. असे महाराज म्हणाले. लहान मुलांना संस्कार करणारी आज्जी आणि आजोबा घरात असले पाहिजे.साधूचे अंतःकरण दयाळू आणि कृपाळ असते.भव सागरातून काढून भाव सागरात घेऊन जातो तो तो गुरु असतो. म्हणून भजन सागरातून भवसागर तारण्याचं काम बंकटस्वामी महाराजांनी केले. असे महाराज म्हणाले. कीर्तस साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंगाचार्य मृदंग सम्राट आसाराम महाराज साबळे, मृदंग अलंकार ओंकार महाराज कागदे यांच्यासह देवगड संस्थान चे लाडके गायक लक्ष्मण महाराज नागरे, सचिन महाराज पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे ते लोणावळा रेल्वे मार्गावरील तिसऱ्या-चौथ्या मार्गिकेसाठी निधी द्या !

## खासदार बारणेंची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-लोणावळा या रेल्वे मार्गाच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेच्या कामाला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. यासाठी राज्य सरकारची ५० टक्के हिश्श्याची रक्कम तातडीने द्यावी. त्यामुळे काम सुरु करण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

खासदार बारणे यांनी याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. तसेच त्यांना तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेबाबत सविस्तर माहिती दिली. या प्रकल्पातील राज्य सरकारचा हिस्सा तातडीने देण्याची मागणी केली.

खासदार बारणे म्हणाले, गेल्या तीन दशकांपासून पुणे, लोणावळा दरम्यान तिसरा आणि चौथा ट्रॅक व्हावा अशी मावळ लोकसभा मतदारसंघातील आणि पुणे शहरातील नागरिकांची मागणी आहे.



२०१४ मध्ये मी निवडून आल्यानंतर त्यासाठी पाठपुरावा सुरु केला. केंद्र सरकारने २०१५-१६ मध्ये पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसरा आणि चौथ्या ट्रॅक करण्याची घोषणा केली. त्याचा विकास आराखडा (डीपीआर) तयार केला. १५ फेब्रुवारी २०१९ मध्ये रेल्वे बोर्डाने महाराष्ट्र सरकारला प्रस्ताव पाठवला आहे. त्यासाठी २०१७ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद देखील केली.

प्रकल्पाचा ५० टक्के खर्च केंद्रीय रेल्वे विभाग आणि ५० टक्के राज्य सरकार, अशी खर्चाची विभागणी आहे. राज्याच्या ५० टक्यांमध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सहभाग राहणार आहे. अनेक वर्ष हा प्रकल्प रखडला आहे. राज्य सरकारने आपल्या हिश्श्याचा निधी न दिल्यामुळे प्रकल्पाला विलंब होत आहे. नागरिकाची सोय आणि लोकल सेवा सुरळीत होण्यासाठी ह्या मार्गिक होणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे पुणे - लोणावळा तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकांसाठी राज्य सरकारच्या हिश्श्याचा निधी तत्काळ मिळावा, असे बारणे यांनी सांगितले. तिसरा, चौथा ट्रॅक करण्यासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हे सहकार्य करीत आहेत. मागील आठवड्यात ते पुणे दौऱ्यावर आले असता त्यांनी या कामाला तत्काळ सुरुवात करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सांगितले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनीही निधी देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे राज्य सरकारचा हिस्सा मिळून लवकरच कामाला सुरुवात होईल, अशी आशा आहे.

# तुर्कीच्या सफरचंदावर पुण्यातील व्यापाऱ्यांचा बहिष्कार

**पुणे । प्रतिनिधी**

भारत- पाकिस्तान यांच्यात तणावाची स्थितीत जगभरातून भारताला मोठा पाठिंबा मिळत आहे. मात्र, पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्कीला भारतीय व्यापाऱ्यांनी धक्का दिला आहे. तुर्कीच्या सफरचंदांवर बॅन तुर्की म्हणत व्यापाऱ्यांनी बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे तुर्की सफरचंद बाजारातून गायब झाली आहेत. इराणमधून येणाऱ्या सफरचंदांचे दर वाढले आहेत. घाऊक बाजारात १० किलो सफरचंदामागे २०० ते ३०० रुपये, तर किरकोळ बाजारात प्रति किलो २० ते ३० रुपये दराने वाढ झाली आहे.



व्यापाऱ्यांनी तुर्की सफरचंदाऐवजी इराण, वॉशिंग्टन आणि न्यूझलँड सफरचंदाला पसंती दिली आहे. इराण, वॉशिंग्टन आणि न्यूझलँड सफरचंदाच्या भावात पेटीमागे २०० ते ३०० रूपयांची वाढ झाली असल्याची माहिती मार्केट यार्डातील सफरचंदाचे आडतदार, श्री गुरुदेव दत्त फ्रूट एजन्सीचे सत्यजित झेंडे यांनी दिली. मार्केट यार्डात देशासह परदेशातून सफरचंदाची आवक होत असते. भारत-पाकिस्तान तणावामुळे परदेशातील सफरचंदाच्या व्यवहारावरदेखील परिणाम झाला आहे.

जगभरातून विविध देशांकडून भारताला पाठींबा मिळत असताना तुर्कीने पाकिस्तानला पाठिंबा दिला आहे. यामुळे व्यापाऱ्यांनी बॅन तुर्की हा ट्रेंड चालवत तुर्की सफरचंदावर बहिष्कार घातला आहे. इराणचा हंगाम शेवटच्या टप्प्यात आल्यानंतर आपल्याकडे तुर्की सफरचंदाचा हंगाम चांगला चालतो. इतर देशातील सफरचंदापेक्षा तुर्की सफरचंद परवडते. यंदा उत्पादन कमी असले तरी यंदा भारत-पाकीस्तान युध्दजन्य परिस्थितीत तुर्कीने पाकिस्तानला पाठींबा दिला. त्यामुळे अनेक व्यापाऱ्यांनी तुर्कीकडून खरेदी बॅन केली असून व्यापाऱ्यांनी देशासाठी तुर्कीकडून खरेदी करणे टाळले आहे.

यंदा पाऊस, पावसामुळे रस्ते बंद होते. त्यानंतर पेहलगाम आणि सध्या तणावाच्या परिस्थितीमुळे सफरचंदावरील प्रक्रिया ठप्प झाली आहे. भारत-पाकिस्तान तणावाच्या परिस्थितीमुळे नियंत्रित तापमान कक्षात (कंट्रोल्ड ॲटमॉसफिअर टेक्नॉलॉजी चेंबर) ठेवण्यात आलेली कश्मीरमधील सफरचंदाच्या आवकेवर यंदा परिणाम झाला आहे. ही सफरचंदे हंगाम संपल्यानंतरही देशभरातील बाजारपेठेत उपलब्ध होतात.

## आंबेगाव तालुक्यात भोरवाडी येथे सामुदायिक विवाह सोहळा, बालविवाह रोखण्यासाठी सामुहिक शपथ



**पुणे । प्रतिनिधी**

ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेच्या प्रकल्प अधिकारी माधुरी गावडे यांनी बालविवाहाचे सामाजिक, मानसिक व शारीरिक दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी गावडे व रोहिणी पिंगळे यांनी उपस्थितांना आवाहन केले की, मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ पूर्ण झाल्याशिवाय विवाह करु नये.

सामुदायिक विवाहात सहभागी झालेल्या वर-वधूंच्या कुटुंबियांनी व समाजातील नागरिकांनी आपल्या परिसरात बालविवाह होऊ न देण्याची ग्वाही दिली. माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील,म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, सुरेश भोर, जयसिंग एरंडे, निलेश थोरात, शंकर पिंगळे, सुषमा शिंदे व आनंदराव शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिवसम्राट युवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष किरण भोर, उपाध्यक्ष स्वप्नील भोर, उपसरपंच प्रविण भोर, विकास भोर, अक्षय भोर, दीपक भोर व मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व्यवस्था पाहिली.

# शेतकऱ्यांसाठी गतिशीलतेने काम करा-आ. माऊली कटके

**शिरूर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शेती विभागाने अधिक गतिशीलतेने काम करावे, असे आवाहन आमदार ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली कटके यांनी केले. शिरूर तहसील कार्यालयाच्या सभागृहात खरीप हंगाम नियोजन व आढावा बैठकीचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. ही बैठक शिरूर व हवेली तालुका कृषी अधिकारी आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली.



बैठकीत शिरूर तालुक्याचे कृषी अधिकारी सुवर्णा आदक, हवेली तालुक्याचे एम. डी. साळे यांनी खरीप हंगामाचे नियोजन सादर केले. खत व बियाणे याबाबत पंचायत समिती शिरूरचे कृषी अधिकारी दिनेश आडसुळ आणि हवेलीचे कृषी अधिकारी डॉ. गजानन नारकर यांनी माहिती दिली.

शेतकरी संघटनेचे नेते बाळासाहेब घाडगे यांनी पिकांना हमीभाव मिळावा, अशी मागणी शासनाकडे केली. आमदार कटके यांनी यावेळी कृषी विभाग व पंचायत समित्यांना खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेवर सेवा आणि सुविधा देण्यासाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले. त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या पथदर्शी प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यात केळी व आंबा लागवड क्षेत्रात वाढ करून निर्यातक्षम उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. यासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

कार्यक्रमात प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत लाभार्थींना- आंबळे येथील सीमा बेंद्रे आणि शिक्रापूर येथील नंदाताई भुजबळ यांचा सत्कार करण्यात आला. राज्यस्तरीय बाजरी पीक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या ताराबाई बांदल यांचाही गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र जगदाळे, पंचायत समिती सदस्य आबासाहेब सरोदे, रामभाऊ कदम, गावचे सरपंच, उपसरपंच, खरेदी विक्री संघाचे संचालक, महावितरण अधिकारी, पीडीसीसी बँक अधिकारी, कृषी विभागातील विविध अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन कृषी सहायक जयवंत भगत यांनी केले. कृषी अधिकारी डॉ. गजानन नारकर यांनी आभार मानले.


कांदा चाळ अनुदानात वाढ- कटके

गणेगावचे सरपंच तुकाराम निंबाळकर यांनी कांदा चाळ अनुदान वाढीबाबत सूचना मांडल्या. यावर कटके यांनी सांगितले की, कांदा चाळ अनुदान वाढविण्यात आले असून आता २५ टन क्षमतेच्या चाळीस एका टनाला ५००० रुपये अनुदान दिले जाणार आहे, असे आमदार कटके यांनी सांगितले.

## पुण्यात पॅलेस्टाईन समर्थन पोस्टर वाटपावरून राडा; 'त्या' तरुणांना चोप

**पुणे । प्रतिनिधी**

भारत-पाकिस्तान युद्धविरामाच्या घोषणेनंतर आता पुण्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही तरुणांकडून पॅलिस्टीनच्या समर्थनार्थ आंदोलन करुन पोस्टर वाटल्याचे समोर आले आहे. या तरुणांना पोस्टर वाटप करत करता राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी चोप दिला आहे. दरम्यान वारजे पोलीस ठाण्यात दोन्ही गट तक्रार दाखल करण्यासाठी गेले होते. मात्र अद्यापही कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नाही.



सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कर्वेनगर भागांत काही तरुण पॅलिस्टीन समर्थनार्थ पोस्टर वाटप करत असल्याची माहिती भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांना मिळाली. हे पोस्टर्स तेथील एका मल्टीनॅशनल पिझ्झा कंपनीच्या समोर वाटण्यात येत होते. तेथे एका राजकीय पक्षाचे कायकर्ते पोहोचले आणि या तरुणांना हटकले. त्यांच्यात आणि कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. दरम्यान स्थानिक नागरिकांनीही या तरुणांना चोप दिला. आता नागरिकांनी या तरुणांवरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# लोकअदालतीत कोट्यवधींचा वाद निकाली

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील सर्वात मोठ्या रक्कमेचा व्यावसायिक वादाचा दावा समुपदेशनाद्वारे निकाली निघाला आहे. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकाराने तडजोड झालेल्या दाव्यात ३ कोटी रुपयांची रक्कम देण्यात आली. शनिवारी (दि.१०) झालेल्या लोकअदालतमध्ये उत्पादक आणि पुरवठा कंपनीतील हा वाद मिटवण्यात आला. यामध्ये पुरवठादाराने उत्पादक कंपनीला वरील रक्कम दिली. प्रशिक्षित मध्यस्थ ॲड. अतुल गुंजाळ यांनी याप्रकरणी यशस्वी समुपदेशन केल्याने दाखल होण्यापूर्वीच दावा निकाली निघाला.

व्यावसायिक न्यायालय अधिनियम २०१८ नुसार टलास केमिकल्स कंपनीने एबीसी इन्क कंपनीविरोधात ४ कोटी ९० लाख ३७ हजार ४३९ रुपयांच्या वसुलीसाठी दावा दाखल केला होता. हा दावा प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने सचिव न्यायाधीश सोनल



पाटील यांनी मध्यस्थीसाठी ॲड. अतुल गुंजाळ यांच्याकडे पाठविला. टलास केमिकल्स कंपनीने वसुलीची सर्व रक्कमेची मागणी केली असता एबीसी इन्क कंपनीनीने अडीच कोटी रुपये देणे असल्याची भूमिका घेतली. टलास कंपनी मात्र व्याजासह ही रक्कम ५ कोटी असल्यावर ठाम होती. दावा दाखल करणाऱ्या पक्षकाराचे वय ७८ तर दुसऱ्याचे वय ७५ असल्याने त्यात पुढील २० ते २५ वर्षे दावा चालणार असल्याने शिवाय दोन्ही बाजूंना वकिलांचा खर्च, होणारा मानसिक त्रास आदी बाजू समुपदेशनाद्वारे मांडण्यात आल्या, त्यामुळे तडजोड ३ कोटी रुपयांमध्ये हा दावा अखेर निकाली निघाला.

## मेव्हणीबरोबर बोलतो म्हणून खडसावल्याने केला खून, आरोपीला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

मेव्हणीबरोबर बोलू नको,असे सांगितल्याचा राग आल्याने एकाने लाकडी बांबुने मारहाण करून संबंधित व्यक्तीचा खून केला. ही घटना शनिवारी रात्री अकराच्या सुमारास मांगडेवाडी येथे घडली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटकही केली आहे.

मनोहर दिनकर शिंदे (वय ४६, रा. पवारनगर, गुजरवाडी रस्ता, मांगडेवाडी) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर त्याचा खून केल्याच्या आरोपातून पोलिसांनी रोहित मारुती आसुरे (वय ३२, रा. खोपडेनगर, पुणे) याला अटक केली आहे. याप्रकरणी मांगडेवाडी येथे राहणारे मंगेश बालवडकर यांनी फिर्याद दिली आहे.

शिंदे हे त्यांची मेहूणीला आरोपी आसुरे याच्यासोबत बोलू नको असे सांगत होते. तसेच ते आरोपीलाही तेच सांगत होते. यातून त्यांचा दोन ते तीन वेळा वादही झाला. त्याचा राग मनात धरून आरोपी आसुरे याने इतर साथीदारासोबत येऊन शिंदे यांना व त्यांच्या मुलाला शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी मारहाणही केली. तसेच लाकडी बांबुने मारहाण केली. यामध्ये शिंदे यांचा मृत्यू झाला. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक समीर शेंडे हे करत आहेत.

# पुण्यात दुर्मिळ 'लेपर्ड कॅट'चे यशस्वी प्रजनन, देशातील पहिलीच घटना

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रजमधील राजीव गांधी प्राणिसंग्रहालयात एक अत्यंत आनंददायी घटना घडली आहे. येथे दुर्मिळ 'लेपर्ड कॅट' या वन्यजीव प्रजातीचे यशस्वी प्रजनन झाले आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये एका मादी 'लेपर्ड कॅट'ने एका सुंदर पिल्लाला जन्म दिला आणि आता हे पिल्लू सहा ते सात महिन्यांचे झाले आहे.

विशेष म्हणजे, प्राणिसंग्रहालयात 'लेपर्ड कॅट'चे प्रजनन होण्याची ही देशातील पहिलीच घटना आहे, यामुळे पुणे शहराने वन्यजीव संवर्धनाच्या क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला असल्याचे चित्र दिसत आहे.'लेपर्ड कॅट' ही एक



लहान, निशाचर आणि सहसा लाजाळू वृत्तीची वन्य मांजर आहे. त्यांना नैसर्गिक अधिवासात पाहणेही दुर्मिळ असते. अशा परिस्थितीत, पुण्यातील प्राणी संग्रहालयात त्यांचे यशस्वी प्रजनन होणे, ही केवळ प्राणी संग्रहालय प्रशासनासाठीच नव्हे, तर सर्व प्राणीप्रेमींसाठी एक मोठी आनंदाची बाब आहे. या लहानशा पिल्लाच्या आगमनाने प्राणी संग्रहालयातील वातावरण उत्साहाने भारले आहे. अधिकारी आणि कर्मचारी या पिल्लाची विशेष काळजी घेत आहेत आणि त्याला निरोगी वातावरणात वाढवण्याचा त्यांचा निर्धार आहे.

## 'नूतन अभियांत्रिकी'ची माजी विद्यार्थिनी सोनल खांदवे-शिंदे बनली सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी

**पुणे । प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे येथील नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ संस्थेच्या नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग ह्या विभागातून उत्तीर्ण झालेल्या सोनल खांदवे - शिंदे यांची राज्यसेवा २०२३ परीक्षेमधून सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (वर्ग १) पदी निवड झाली आहे.




सोनल यांची यापूर्वी महाराष्ट्रात तिसऱ्या आणि मुलींमध्ये प्रथम क्रमांकाने सहाय्यक कक्ष अधिकारी पदावर निवड झाली होती. सध्या त्या मंत्रालयात औषधी द्रव्य आणि वैद्यकीय शिक्षण विभागात सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्या नूतन महाराष्ट्र अभियांत्रिकीचे माजी विद्यार्थी, आदिवासी प्रकल्प अधिकारी आकाश दिलीप शिंदे यांच्या पत्नी आहेत.

सोनल यांचे यश हे अथक परिश्रमाचे फळ असून संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. संस्थेचे अध्यक्ष संजय भेगडे, उपाध्यक्ष गणेश खांडगे, सचिव संतोष खांडगे, सहसचिव नंदकुमार शेलार, खजिनदार तसेच अभियांत्रिकीच्या कार्यकारी समितीचे चेअरमन राजेश म्हस्के, संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, अभियांत्रिकीचे सीईओ डॉ. रामचंद्र जहागीरदार, प्राचार्य डॉ. एस. एन. सपली आदी मान्यवरांनी सोनल यांचे अभिनंदन केले आहे.

# १० लाख विद्यार्थी घेणार रस्ता सुरक्षेचे धडे!

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) शहरातील तब्बल १० लाखांहून अधिक शालेय विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा नियमांचे महत्त्व पटवून देण्यासाठी कंबर कसली आहे. 'रोड सेफ्टी ट्रेक' या त्यांच्या नविनतम उपक्रमाद्वारे, लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता रुजवली जाणार आहे. येत्या १ जूनपासून सुरू होणाऱ्या या कार्यक्रमात इयत्ता ५ वी ते १० वीचे विद्यार्थी सहभागी होतील.

आरटीओ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे शहरात जवळपास ८ हजार शाळा असून विद्यार्थ्यांची संख्या १० लाखांच्या वर आहे. या सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना रस्ते सुरक्षेचे शिक्षण देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. दर शनिवारी दिवेघाट येथे या कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल आणि एका दिवसात सुमारे ६०० विद्यार्थी यात सहभागी होतील.

निसर्गरम्य वातावरणात खेळ आणि




मनोरंजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा नियमांची माहिती दिली जाईल. सासवड येथील एका शाळेतील विद्यार्थ्यांसोबत हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आला आहे आता तो संपूर्ण शहर आणि जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी राबवण्याचा आरटीओ अधिकाऱ्यांचा मानस आहे.

शिक्षण विभागाच्या आदेशाप्रमाणे दर शनिवारी विद्यार्थ्यांचा नो बॅगेज डे असतो, त्याच दिवशी आरटीओ कडून दिवेघाट येथील ६ हजार देशी-विदेशी झाडांचे विद्यार्थ्यांना पर्यटन ट्रेक घडविण्यात येणार आहे. त्यानंतर येथेच आरटीओ कडून क्लासरूम तयार करण्यात आली आहे. या क्लासरूम मध्ये विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा बाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

तसेच येथील हॉलमध्ये विद्यार्थ्यांसोबत रस्ते सुरक्षेबाबत मार्गदर्शन करणारी सापशिडी व अन्य गेम्स खेळून त्यांना मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा उपक्रम राबवण्यामागे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांची संकल्पना असून, विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच रस्ते सुरक्षेचे महत्त्व पटवून देणे, हेच हा त्यांचा उद्देश आहे.

या उपक्रमात केवळ विद्यार्थीच नव्हे, तर स्कूल बस चालकांनाही प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यांना आग विझवणारे यंत्र कसे हाताळावे आणि आपत्कालीन परिस्थितीत काय करावे, याचे ज्ञान देण्यात येईल. प्रत्येक विद्यार्थ्याला रस्ते सुरक्षा किट मिळेल, ज्यात दिशादर्शक, स्टिकर्स, शुभेच्छापत्रे आणि महत्त्वाचे रस्ते सुरक्षा संदेश असलेले फ्रेंडशिप बँड असतील.

## दुचाकी दुभाजकाला धडकून विद्यार्थ्याचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्याचा दुचाकी दुभाजकाला धडकून झालेल्या अपघातात मृत्यू झाला, तर सहप्रवासी असलेले पोलिस उपनिरीक्षक या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना शुक्रवारी (ता. ९) रात्री बाराच्या सुमारास लोणी काळभोर येथे घडली.

समाधान संभाजी भिटे (वय ३१, रा. नीर निंबगाव, ता. इंदापूर) असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे, तर समाधानचा मित्र पोलिस उपनिरीक्षक मयूर सुनील डोंगरे (वय २९) हे जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, समाधान व मयूर हे दोघेही त्यांच्या मित्राच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी लोणी काळभोर येथे गेले होते. दरम्यान, दोघेही रात्री पावणेबाराच्या सुमारास दुचाकीवरून परत घरी निघाले होते. पुणे-सोलापूर महामार्गावरील कवडीपाट येथे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी दुभाजकावर आदळली. या अपघातात ते दोघेही जखमी झाले. उपचार सुरू असताना शनिवारी (ता. १०) सकाळी समाधानचा मृत्यू झाला. समाधान यांच्या कुटुंबीयांनी त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. समाधान यांच्या मागे आई-वडील, भाऊ असा परिवार आहे.